


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक १६३ * नांदेड * शुक्रवार, दि. १९ जून २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# नांदेड विधान परिषद निवडणुकीत ९९.७८ टक्के मतदान

## केवळ एका मतदाराने केले नाही मतदान; आठपैकी सात केंद्रावर शंभर टक्के मतदान, सोमवारी मतमोजणी



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निवडणुकीचे मतदान गुरूवार दि. १८ जून रोजी शांततेत व सुरळीत पार पडले. या निवडणुकीत जिल्ह्यातील आठ मतदान केंद्रांवर ४५२ पैकी ४५१ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. त्यामुळे एकुण मतदानाची टक्केवारी ९९.७८ टक्के नोंदवण्यात आली. किनवट, हदगाव, नांदेड, कंधार, धर्माबाद, बिलोली, देगलूर या सात ठिकाणी १०० टक्के मतदान तर भोकर मतदान केंद्रावर ९७.९२ टक्के मतदान झाले आहे. या निवडणुकीची मतमोजणी सोमवार, दि. २२ जून २०२६ रोजी सकाळी ८ वाजता कॅबिनेट हॉल, नियोजन भवन तळमजला जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे होणार आहे.

नांदेड विधान परिषद निवडणुकीच्या रिंगणात तीन उमेदवार आहेत. निवडणुकीसाठीची मतदान प्रक्रिया गुरूवारी सकाळी ८ ते दुपारी ४ यावेळेत पार पडली. त्यासाठी निवडणूक कार्यालयाने काटेकोर नियोजन केले होते. निवडणूक प्रक्रिया शांतता व सुव्यवस्थेत पार पडावी, यासाठी पुरेशा पोलीस बंदोबस्तासह, मतदान प्रक्रियेवर वेब कॅमेऱ्यांद्वारे करडी नजर ठेवण्यात आली होती. मतदानासाठी मतदान केंद्र म्हणून आठही उपविभागीय कार्यालयस्तरावर तहसील कार्यालयांची निश्चिती करण्यात आली होती. निवडणूक निरिक्षक डॉ. माधवी खोडे-चवरे यांनी नांदेड, बिलोली, हदगाव, भोकर, धर्माबाद या मतदान केंद्रांस भेट देऊन व्यवस्थेची पाहणी केली. निवडणूक निर्णय अधिकारी राहुल कर्डिले यांनीही नांदेड मतदान केंद्रातील व्यवस्थेची पाहणी केली.

सकाळी ८ वाजता मतदान प्रक्रियेस प्रारंभ झाला. सकाळी १० वाजेपर्यत ४.८७ तर दुपारी १२ वाजेपर्यंत जिल्ह्यात ५६.८६ टक्के मतदान झाले होते. त्यानंतर दुपारी २ वाजेपर्यंत ८८.९४ टक्के मतदान झाले. अंतिमतः दुपारी ४ वाजता जिल्ह्यातील आठ मतदान केंद्रावर ४५२ पैकी ४५१ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. या ४५२ मतदारांमध्ये २२८ मतदार पुरूष तर २२४ मतदार स्त्रिया होत्या. त्यातील २२८ पुरूष मतदारांनी तर २२३ स्त्री मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला.

मतदानानंतर जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावरील मतपेट्या जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवन येथे जमा करून, त्या कडेकोट बंदोबस्तात ठेवण्यात येणार आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी प्रत्यक्ष भेट देऊन व्यवस्थेची पाहणी केली. या स्ट्राँगरूमवरही कॅमेऱ्यांची नजर राहणार असून सुरक्षेसाठी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार असल्याचे जिल्हा निवडणूक कार्यालयाने सांगितले.

# अखेर खा. आष्टीकरांसह ६ खासदार फुटले; ऑपरेशन टायगर यशस्वी

## ठाकरेंचा व्हिप जुगारला
## सर्व सहा खासदारांना वाय दर्जा सुरक्षा

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यासह देशात चर्चा सुरू असलेले टायगर ऑपरेशन यशस्वी झाल्याचे समोर आले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्यासह ६ खासदार फुटले असून त्यांनी ठाकरेंचा व्हिप जुगाराला आहे. दरम्यान ठाकरे गटाकडून ऑपरेशन तुडवाची धमकी देण्यात आल्यानंतर गृहविभागाने या सर्व सहा खासदारांना वाय दर्जाची सुरक्षा देण्याचे आदेश दिले आहेत.

ठाकरेंच्या शिवसेनेकडून गुरूवारी संसदीय दलाची बैठक बोलावण्यात आली होती. ठाकरेंच्या शिवसेनेकडून सर्व खासदारांना व्हीप जारी करण्यात आला होता. या बैठकीकडे खासदारांच्या एकनिष्ठतेची लिटमस टेस्ट म्हणून बघितले जात होते. परंतु या बैठकीसाठी लोकसभेचे एकूण ९ पैकी ३ खासदार उपस्थित राहिले. ऑपरेशन टायगरमधील चर्चेत असणारे ६ खासदार गैरहजर राहिल्याने एकनाथ शिंदेंचं ऑपरेशन टायगर यशस्वी झाल्याचं शिक्कामोर्तब झालं आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे ६ खासदार शिंदेंच्या गळाला लागले आहेत. या ६ खासदारांनी वेगळा गटही स्थापन केला आहे आणि तसं पत्र लोकसभा अध्यक्षांना दिल्याची माहिती आहे. ऑपरेशन टायगर (फुलप्रूफ) झालेले असून आता लगेच काहीही जाहीर करायचे नाही, कोणतेही पुरावे द्यायचे नाही असं शिंदे शिवसेनेकडून ठरवण्यात आल्याचं कळतंय. ठाकरे गटाचे कायदेशीर डावपेच बघूनच पुढील पावलं टाकली जातील. पुढील २ दिवस तरी अधिकृतरित्या काहीही समोर आणलं जाणार नाही, अशी माहिती शिवसेनेच्या वरिष्ठांनी दिली आहे. अतिशय काटेकोरपणे आणि नियोजन पद्धतीनं ऑपरेशन टायगर राबवलं गेल्याची माहिती हळूहळू समोर येत आहे.

### सहा खासदारांच्या विलिनीकरणासाठी शनिवारचा मुहूर्त?

ज्या सहा खासदारांनी ठाकरेंना सोडून स्वतंत्र गट निर्माण केला आहे, त्यांच्या विलिनीकरणाची घोषणा संसदेकडून शनिवारी केली जाणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे ऑपरेशन टायगर यसस्वी झालं असलं तरी त्याची घोषणा ही शिवसेनेच्या वर्धापणदिनानंतरच केली जाणार असल्याचं स्पष्ट झालं आहे.

### संजय राऊतांची 'ऑपरेशन तुडवा'ची धमकी

बंडखोर खासदारांना सुरक्षा देण्याच्या सरकारच्या निर्णयावर आणि त्यांच्या बंडखोरीवर संजय राऊत यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले, तुम्ही आमच्या जिवावर, आमच्या पक्षावर आणि चिन्हावर निवडून आले आहात. जर तुमच्यात हिंमत असेल तर तात्काळ राजीनामा द्या आणि पुन्हा निवडून येऊन दाखवा. आम्ही आता गद्दारांविरोधात ऑपरेशन तुडवा सुरू करत आहोत, असा इशारा संजय राऊत यांनी दिला.

# परभणी स्थागुशाचे पोलीस निरीक्षक तडक नांदेड नियंत्रण कक्षात; डीआयजी शहाजी उमाप यांचा दणका

- इतर ८ अंमलदार पोलीस मुख्यालयात
- अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील करणार चौकशी

**नांदेड (प्रतिनिधी)–** परभणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हे नांदेड नियंत्रण कक्षात तर इतर ८ अंमलदार पोलीस मुख्यालयात संलग्न करण्यात आले आहेत.

परभणी जिल्ह्यातील अवैध व्यवसायांबाबत गंभीर स्वरूपाची तक्रार पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्राप्त झाली होती. सदर तक्रारीत, जिल्ह्यातील वाळू वाहतूक व इतर अवैध व्यवसायांना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हे जबाबदार असल्याचे म्हटले होते. त्यामुळे परभणी स्थागुशाच्या पोलीस निरीक्षकाला नांदेड नियंत्रण कक्षात संलग्नीत केले आहे. उपरोक्त तक्रारीची गंभीर दखल घेऊन, सदर प्रकरणास जबाबदार असणाऱ्या अधिकारी व अंमलदारांची चौकशी अपर पोलीस अधीक्षक भोकर अर्चना पाटील यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

दरम्यान, परभणी येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना नियंत्रण कक्ष, नांदेड येथे तर स्थानिक गुन्हे शाखेत नेमणुकीस असणाऱ्या इतर ८ अंमलदारांना पोलीस मुख्यालय, परभणी येथे संलग्न करण्यात आले आहे.

परभणी जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या अवैध व्यवसायांविरुद्ध कठोर कारवाई करून ते नेस्तनाबूत करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक, परभणी यांना देण्यात आल्या आहेत.

# पोटच्या दोन लेकरांना विष पाजले; एकाचा मृत्यू

## आजोबांच्या तक्रारीवरून आई-वडिलांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** हदगाव तालुक्यातील मनुला बु. येथील सिद्धांत व त्याची पत्नी शुभांगी यांनी आपल्या पोटच्या दोन लेकरांना पेयामध्ये विषारी औषध टाकून पाजले व हा गुन्हा लपवण्यासाठी २४ तास दार लावून घरातच बसले. दोन्ही लेकरांवर नांदेड येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना मुलगा सुमित सिद्धांत भालेराव (वय ५) याचा मृत्यू झाला. तर मुलगी साक्षी भालेराव (वय ७) ही मृत्यूशी झुंज देत आहे. या प्रकरणी आजोबांच्या तक्रारीवरून आई-वडिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हदगाव तालुक्यातील मनुला बु. येथील नंदू भालेराव यांच्या कुटुंबात एकूण सात सदस्य आहेत. त्यांचा मुलगा सिद्धांत भालेराव (वय ३२) याचे लग्न आठ वर्षांपूर्वी झाले असून तो शेतमजुरी करून उदरनिर्वाह करतो. त्याना एक मुलगी साक्षी व मुलगा सुमित अशी अपत्य आहेत. दि. १४ जून रोजी रविवारी सिद्धांत हा निवघा (बा) येथील आठवडी बाजार करून आला. आपल्या खोलीत मुलांना व पत्नी सोबत रात्री जेवण करताना कोणत्यातरी पेयामध्ये विष कालवून दोन्ही मुलांना पिण्यासाठी दिले. ते सर्व जेवण करुन झोपले.



दुसऱ्या दिवशी सोमवारी सकाळी सात वाजताचे दरम्यान नेहमीप्रमाणे त्याचे आई, वडील व बहीण मजुरीचे काम करण्यासाठी गेले. जाताना मुलगा सिद्धांथ याचे घर बंद असल्याचे दिसले. सायंकाळी ते घरी कामावरून परत आले असता मुलाचे घर बंद दिसले. त्यानंतर वडील नंदू भालेराव यांनी मुलाला आवाज देऊन घराचे दरवाज्यावर थाप मारली असता मुलगा सिद्धांथ याने दरवाजा उघडला. त्याची मुलगी साक्षी ही उलटी करीत होती व मुलगा सुमित हा बेशुद्ध अवस्थेत होता. त्यामुळे आजोबांनी त्यांना दवाखान्यात दाखल केले. यावेळी डॉक्टरांनी लेकरांना जेवणातुन विषाबाधा झाल्याचे सांगितले. लेकरांच्या आजोबांनी नात साक्षीला तुला काय झाले असे विचारले असता तिने सांगितले की, मला व भाऊ सुमितला मम्मीने व पप्पाने खोकल्याचे औषध पाजून चिवडा खायला दिला. दि. १७ जून रोजी नातू सुमितचा उपचारादरम्यान मृत्यू झाला तर नात साक्षीवर उपचार सुरू आहेत. याबाबत मुलाला विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली.

याप्रकरणी आजोबा नंदू भालेराव यांनी मुलगा सिद्धांत व सून सुलाचेना उर्फ शुभांगी भालेराव यांच्याविरोधात पोलिसांत तक्रारी दिली. या प्रकरणी आई-वडिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# 'एमआयएम'च्या १५ नगरसेवकांचे मतदान

## पक्षाचा व्हीप नसताना कोणाचे पारडे केले जड?



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्थानिक स्वराज्य विधान परिषदेच्या निवडणुकीत गुरुवार, दि. १८ जून रोजी एमआयएम पक्षाकडून मतदान करण्यासाठी कुठलाही व्हीप जारी केला नव्हता. त्यांच्या १५ नगरसेवकांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. परंतु त्यांनी मतदान कोणाच्या बाजूने केले हे २२ जून रोजी स्पष्ट होणार आहे.

महापालिका निवडणुकीपासून एमआयएमवर खा. अशोकराव चव्हाण यांचे जुने समर्थक तथा बी टीम असल्याचा आरोप होत असतो. त्याच एमआयएमचे नांदेड महापालिकेत १४ नगरसेवक आणि १ स्वीकृत सदस्य आहे. विशेष म्हणजे विधान परिषदेसाठी मतदान करण्याबाबत त्यांच्या पक्षाने कोणतेही आदेश दिले नव्हते. मात्र विरोधी पक्षाचे उमेदवार असतांना या सर्व १५ नगरसेवकांनी मतदान केल्याचे दिसून आले. त्यामुळे त्यांनी नेमके कोणाला मतदान केले याबाबत मात्र चर्चा सुरू झाली.

विशेष म्हणजे नांदेड विधान परिषदेसाठी भाजप महायुतीचे उमेदवार अमर राजूरकर आणि महाविकास आघाडी पुरस्कृत कृष्णा आष्टीकर यांच्यात मुख्य लढत आहे. हे दोन्ही उमेदवार विरोधी विचारसरणीचे असताना एमआयएमच्या सर्व नगरसेवकांनी मतदान केल्याने त्यांच्या मतदान कोणाला जाणार याची सर्वांनाच उत्सुकता आहे.

# नीट (युजी) २०२६ प्रवेश परिक्षार्थींची होणार वैद्यकीय तपासणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** नीट (युजी)-२०२६ प्रवेश परीक्षा काळात प्रतिबंधित वस्तूच्या वापरांवर प्रशासनाचे कडक लक्ष असून, इलेक्ट्रॉनिक, ब्लुटूथ वापर बंदी करण्यासाठी परीक्षार्थींची वैद्यकीय तपासणी होणार आहे. जर परीक्षा केंद्रावर प्रतिबंधीत करण्यात आलेल्या वस्तू परीक्षार्थीकडे आढळून आल्यास तो अनुचित साधनांचा वापर मानला जाईल. नियमानुसार व कायद्यानुसार संबंधित उमेदवाराविरुध्द कारवाई करण्यात येईल. याची नोंद सर्व परीक्षार्थीनी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

राष्ट्रीय परीक्षा एजन्सी नवी दिल्ली मार्फत आयोजित नीट (युजी)-२०२६ फेर प्रवेश परीक्षा नांदेड जिल्ह्यात २१ जून २०२६ रोजी दुपारी २ ते ५.१५ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. सदरील परीक्षेकरिता नांदेड जिल्ह्यात एकूण ४२ केंद्र असून त्यापैकी नांदेड शहरात २५ परीक्षा केंद्रे तसेच ग्रामीण भागात १७ परीक्षा केंद्र अशी एकूण ४२ परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आलेली आहेत. नीट युजी-२०२६ प्रवेश परीक्षेसाठी पात्र उमेदवारांनी २१ जून २०२६ रोजी परीक्षा केंद्रावर सकाळी ठीक ११ वाजता रिपोर्टींग करावे. स.११ ते १.३० ही वेळ परिक्षार्थीची तपासणीची वेळ राहील.

परीक्षा केंद्रावर परीक्षा कालावधीत परीक्षार्थी मार्फत कोणत्याही गैर मार्गाचा अवलंब होऊ नये. जसे की, इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा, ब्लूटूथचा वापर तसेच मनगटी डिजिटल घडयाळीचा वापर करण्याचे परीक्षार्थी यांनी कटाक्षाने टाळावे तसेच वरील बाबींना आळा घालण्यासाठी परीक्षार्थी यांची परीक्षा केंद्रावर वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत ELECTRONIC DIVICE, EAR BUD व तत्सम बाबीची तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत पडताळणी केली जाणार आहे याची सर्व परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी.

उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत नीट (युजी)-२०२६ फेर प्रवेश परीक्षा केंद्रामध्ये खालील वस्तू घेऊन जाण्याची परवानगी असणार नाही.


उदा. मजकूर साहित्य, मुद्रित किंवा लिखित कागदाचे तुकडे, भूमिती पेन्सिल, बॉक्स, प्लास्टिक पाऊच, कॅल्क्युलेटर, स्केल, लेखन पॅड, पेन ड्राईव्ह, कॅल्क्युलेटर लॉंग टेबल, इलेक्ट्रॉनिक पेन स्कॅनर इत्यादी कोणतीही स्टेशनरी वस्तू उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर आणू नये.

कोणत्याही लपवून आणण्याजोग्या वस्तू मायक्रोचीप, कॅमेरा, ब्लूटूथ, इ. उपकरण संप्रेषण साधने इतर कोणतीही वस्तू जी अनुचित साधनांसाठी वापरली जाऊ शकते त्या सर्व वस्तू प्रतिबंधित करण्यात आलेल्या आहेत त्याची परीक्षार्थी यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# दरीत कार कोसळली, ७ जणांचा मृत्यू

**चंबा (प्रतिनिधी)–** हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यात गुरुवारी पहाटे एक भीषण रस्ता अपघात घडला. भरधाव कार खोल दरीत कोसळल्याने सात जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील सहा सदस्यांचा समावेश असल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

माहितीनुसार, पुखरी-मसरुंद मार्गावरील मनी झिरो परिसरात ही दुर्घटना घडली. धार्मिक कार्यक्रम आटोपून परतणारे काही जण कारमधून आपल्या गावी जात होते. पहाटेच्या सुमारास चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार सुमारे ५०० फूट खोल दरीत कोसळली. अपघाताचा जोर इतका प्रचंड होता की वाहनाचा पूर्णपणे चुराडा झाला.




# हिंगोलीची खासदारकी आणि पक्षांतर ठरलेलेच! खा. आष्टीकरांमुळे इतिहासाची पुनरावृत्ती



**नांदेड (प्रतिनिधी)–** हिंगोली जिल्ह्याची खासदारकी आणि पहिल्याच खासदारकी नंतर त्या खासदाराचे पक्षांतर ही बाब जणू ठरलेलीच आहे असा प्रत्यय सातत्याने येत आहे. या लोकसभा मतदारसंघात खासदार निवडून येतात आणि हमखासपणे पक्ष बदलतात अशी काहीशी परंपराच जणू येथे रूढ झाली आहे.

हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना ठाकरे गटाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी ठाकरे यांच्या पक्षाची साथ सोडत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेने सोबत जाण्याचा निर्णय घेतल्याचे गुरूवारी स्पष्ट झाले. शिवसेना ठाकरे गटातून बाहेर पडलेल्या महाराष्ट्रातील एकूण सहा खासदारांमध्ये खासदार आष्टीकर यांचाही समावेश आहे. खासदार आष्टीकर यांच्या या पक्षांतरामुळे हिंगोली लोकसभा मतदारसंघाच्या खासदारांची पहिल्याच खासदारकीत पक्ष बदलण्याची रूढ होत चाललेली परंपरा यामुळे अधिकच गडदपणे अधोरेखित झाली आहे.

गेल्या काही दशकांचा या लोकसभा मतदारसंघाचा इतिहास पाहिल्यास या मतदारसंघातून निवडून आलेले खासदार हमखासपणे पक्षांतर करीत आलेले आहेत. १९९३ मध्ये शिवसेनेचे खासदार विलास गुंडेवार यांच्यापासून सुरू झालेली ही काहीशी अजब परंपरा खासदार आष्टीकर यांनीही एक प्रकारे पुढे कायम ठेवली आहे, असेच म्हणावे लागेल. शिवसेनेचे तत्कालीन बडे नेते छगन भुजबळ यांनी शिवसेनेत मोठे बंड करून अनेक खासदार आणि आमदार फोडून शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. या बंडाची त्यावेळी संपूर्ण देशभरात मोठी चर्चा झाली होती. या बंडात हिंगोलीचे शिवसेना खासदार गुंडेवार यांचाही समावेश होता.

खासदार गुंडेवार यांच्यानंतर हिंगोली लोकसभा मतदारसंघातून शिवाजी माने हे एक वेळा पराभूत तर दोन वेळा विजयी झाले. मात्र नंतर त्यांनी पक्ष बदलला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सूर्यकांताताई पाटील यांनीही राष्ट्रवादी काँग्रेस सोडून त्यावेळी भाजपात प्रवेश केला. त्यानंतर तत्कालीन खासदार सुभाष वानखेडे यांनी शिवसेनेला सोडचिठ्ठी देत त्यावेळी भाजपात प्रवेश केला. त्यानंतर मागच्या लोकसभा निवडणुकीत तत्कालीन खासदार हेमंत पाटील हे उद्धव ठाकरे यांची साथ सोडत एकनाथ शिंदे यांच्या बंडात सहभागी झाले.

गेल्या अनेक दशकांच्या या अजब परंपरेला कायम राखत आता या मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी शिवसेना ठाकरे गटाची साथ सोडून शिवसेना शिंदे गटाच्या सोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. विशेष बाब म्हणजे त्या त्या पक्षांची साथ सोडलेले खासदार पुन्हा खासदार होऊ शकलेले नाहीत हाही हिंगोली लोकसभा मतदारसंघाचा अनोखा इतिहास आहे. यात तत्कालीन खासदार हेमंत पाटील मात्र नशीबवान ठरले आहेत, त्यांना पुन्हा खासदारकी मिळालेली नसली तरी विधिमंडळाच्या ज्येष्ठ सभागृहाचे अर्थात विधानपरिषदेचे ते आमदार झालेले आहेत.

**विलास गुंडेवार :** शिवसेना सोडून छगन भुजबळ यांच्या बंडात सहभाग घेत काँग्रेसमध्ये
**शिवाजी माने :** शिवसेनेतून भाजपात
**सूर्यकांता पाटील :** राष्ट्रवादी काँग्रेस सोडून भाजपात आणि मग परत राष्ट्रवादी शरद पवार गटात
**सुभाष वानखेडे :** शिवसेनेतून भाजपात नंतर काँग्रेस आणि आता शिवसेना शिंदे गटात
**हेमंत पाटील :** शिवसेनेतच पण एकनाथ शिंदे यांच्या बंडात सहभाग.
**नागेश पाटील आष्टीकर :** शिवसेना ठाकरे गटातून शिवसेना शिंदे गटात

### फक्त एकदाच खासदारकी !

हिंगोली लोकसभा मतदारसंघातून तत्कालीन खासदार विलास गुंडेवार यांच्यापासून सुरु झालेल्या बंडाच्या या सत्रापासून नंतर केवळ शिवाजी माने हेच केवळ दोन वेळा खासदार झाले. बाकी सर्वच्या सर्व खासदारांना एक वेळा खासदार झाल्यानंतर पुन्हा या ठिकाणी खासदार होता आलेले नाही. त्यामुळे हिंगोलीतून एक वेळा खासदारकी आणि नंतर पक्षांतर ठरलेलेच असल्याचे समीकरणच जणू या ठिकाणी रूढ होताना पाहायला मिळत आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# मीटर 'स्मार्ट' पण...

आता नवीन प्रकारचे विद्युत मीटर अर्थात स्मार्ट मीटर बसविण्याचा उपक्रम शासनाने हाती घेतला आहे. शासनाच्या सवयीप्रमाणे आणि सोयीप्रमाणे हे कंत्राट खाजगी व्यक्तींना देण्यात आले आहे. यालाच म्हणतात जनकल्याणाची योजना. त्यासोबतच जनतेचेही कल्याण होणार आहे, असे सांगण्यात येते आहे. सदरील स्मार्ट विद्युत मीटर अत्यंत स्वस्त म्हणजे फक्त बारा हजार रुपयाला मिळणार असून, त्यावर येणारे वीज दर देखील जवळपास तेवढेच असेल. यामुळे जनतेने आपल्या खिशातून मन मोठं करून 'अडाणी' माणसांना शहाणं करून त्यांना अतिश्रीमंत केले पाहिजे, नव्हे हे तर त्यांचे कर्तव्यच आहे. त्यामुळे आता लोकांनी पुन्हा कंदील घेण्याचा विचार जर केला तर नवल वाटू नये. परंतु कंदील घेऊन तरी काय करणार? त्यामध्ये टाकण्यासाठी रॉकेल बाजारात उपलब्ध नाही. तशी सोय आधीच करून ठेवण्यात आली आहे. त्या कंदिलामध्ये कोणी पेट्रोल किंवा डिझेल टाकू शकत नाही, टाकायचा प्रयत्न केलाच तर ते देखील परवडणारे नाही. सौर उर्जेवर आधारित दिवे लावण्याचा पर्यायी मार्ग आहे, त्यामध्ये सुद्धा आदरणीय राज्य शासनाने खोडा घातला आहे. यामुळे 'भीक नको, पण कुत्रे आवर', अशी म्हणण्याची वेळ सामान्य माणसावर आली आहे. सौर ऊर्जेसाठी सुद्धा तथाकथित स्मार्ट मीटर कशाला बदलावे लागते? याचे उत्तर शासनाला आणि विद्युत मंडळाला देता आलं नाही. यावरूनच पाणी कुठेतरी मुरतंय हे स्पष्ट दिसतं. स्मार्ट विद्युत मीटरमधून चोरांना मात्र चोरी करण्याची फारच कमी संधी मिळणार आहे. हे खरं असलं तरी सर्वच ग्राहक वीज चोरी करतात असे म्हणता येत नाही. तथाकथित स्मार्ट म्हटल्या जाणारे मीटर लावल्यानंतर अव्वाच्या सव्वा बिल येत आहे, असं ग्राहकांचे म्हणणं आहे. त्यामुळे राज्यभर या विरोधात आंदोलन चालू आहे. जेवढा वापर केला तेवढे बील देण्यास काहीही हरकत नाही, परंतु न वापरलेल्या विजेचे बील का म्हणून द्यावे हा प्रश्न महत्त्वाचा आहे. सर्वच शहरांमध्ये राजकीय वरदस्त प्राप्त असलेल्या वस्त्यांमध्ये लोक विद्युत बील भरत नाहीत. काही ठिकाणी तर मीटरच नाहीत. काही महापुरुषांनी विद्युत प्रवाहाच्या तारेवर आकडे टाकून २४ तास मोफत विद्युत घेण्याची सोय मंडळाच्या नाकावर टिचून करून घेतली आहे. अशा लोकांपुढे मंडळाचे अधिकारी नांग्या टाकतात, कारण त्यांचे हात बरबटलेले असतात. म्हणूनच अशा वरदहस्त प्राप्त भागांमध्ये विद्युत कर्मचारी फिरकण्याची हिंमत सुद्धा करीत नाहीत. शहरातील जवळपास २५ ते ३० टक्के लोक कुठलेच विद्युत बील भरत नाहीत आणि त्यामुळे तो तोटा भरून काढण्यासाठी प्रामाणिक वीज ग्राहकांवर बोजा टाकला जातो आहे, हे उघडच आहे. गरीब बिचाऱ्या ग्राहकांची न दाद, न फिर्याद. सदैव स्मार्ट मीटर हे अदानीच्या खाजगी कंपनीद्वारा बसविण्यात येणार असल्यामुळे विद्युत बील देखील तेच वसूल करणार आहेत आणि खाजगी माणसांकडे कुठल्याही प्रकारचे आरक्षण, तक्रार चालत नसते, हे लक्षात ठेवावे लागेल. ते कोणत्याही राजकीय दबावाला बळी पडत नाहीत. उलट त्यांच्याच दबावाला राजकीय माणसं बळी पडतात. या नवीन उपक्रमाद्वारा विद्युत मंडळाचं आणि 'प्रामाणिक' उद्योजकांचं चांगभलं तर होईल, त्यांच्यापुढे येणाऱ्या ६० पिढ्या काही न करता बसून खाऊ शकतील, परंतु सामान्य जनता मात्र महागाईच्या इतक्या खोल दरीमध्ये पडेल की त्याला तिथून वर येता येणार नाही आणि त्याला काढणार नाही. कारण सामान्याच्या हातात काहीच नसतं.

# कणखर पाठीशी मूक माया: पितृऋणाचा अनमोल वारसा



खिशात जरी नसले पैसे,
तरी कधी नकार दिला नाही,
माझ्या बाबांपेक्षा श्रीमंत माणूस...
मी जगात पाहिला नाही!

'वडील' हे तीन अक्षरी नाव आपल्या प्रत्येकाच्या आयुष्याचा सर्वात मजबूत, अभेद्य आणि खंबीर पाया असतो.

आई घराचं मांगल्य असते, तर वडील त्या घराचा कणा असतात. आईचं प्रेम नदीसारखं खळाळत असतं, जे सगळ्यांना सहज दिसतं आणि जाणवतं. पण वडिलांचं प्रेम हे जमिनीखालच्या गुप्त पाण्यासारखं असतं; जे वरून कधीच दिसत नसलं, तरी संपूर्ण वटवृक्षाला जीवन देण्याचं आणि त्याला उन्हाताहात ताठ मानेने खंबीरपणे उभं ठेवण्याचं काम अहोरात्र करत असतं.

दरवर्षी जून महिन्याच्या तिसऱ्या रविवारी आपण फादर्स डे साजरा करतो. सोशल मीडिया शुभेच्छांनी आणि स्टेट्सने ओसंडून वाहू लागतो. पण आजच्या या गतिमान, बदलत्या आणि आधुनिक युगात वडिलांच्या या अथांग मायेला वंदन करतानाच, एका बाजूला वडिलांविषयीची कृतज्ञता, दुसऱ्या बाजूला त्यांच्या बदलत्या वयाचे वास्तव आणि तिसऱ्या बाजूला आजच्या पिढीतील वडिलांच्या सामाजिक जबाबदारीविषयी वेध घेणे अत्यंत गरजेचे वाटते. हा लेख याच सर्व कौटुंबिक आणि सामाजिक ऋणानुबंधांचा घेतलेला एक सखोल वेध आहे.

जगात कोणत्याही गोष्टी निडरपणे आणि आत्मविश्वासाने करता येतात, ते फक्त आणि फक्त वडिलांमुळेच! माणसाला आयुष्यात पावलोपावली संघर्ष करावा लागतो. कधी व्यवसायात, कधी नोकरीत, तर कधी वैयक्तिक आणि सामाजिक आयुष्यात अनेक चढ-उतार आणि नवनवीन आव्हाने समोर येतात. अशा वेळी आपल्याला जगाशी भिडण्याचं धैर्य कुठून मिळतं? तर ते वडिलांच्या केवळ घरात असण्याने आणि आपल्या पाठीवर असलेल्या त्यांच्या खंबीर हाताने मिळतं. जोपर्यंत वडिलांचं छत्र आपल्या डोक्यावर आहे, तोपर्यंत आपल्यात एक नकळत अशी शक्ती असते, जिच्या बळावर आपण जगातल्या कुठल्याही ठिकाणी अगदी बेधडकपणे वावरू शकतो आणि कोणतंही संकट आपल्याला लहान वाटू लागतं.

वडिलांचे संस्कार, त्यांचे अस्तित्व आणि त्यांची साथ आपल्याला एक असं अदृश्य सुरक्षा कवच देते, ज्यामुळे आपण कोणत्याही नवीन क्षेत्रात निर्धास्तपणे पाऊल टाकू शकतो, धाडसी निर्णय घेऊ शकतो. तू प्रामाणिकपणे प्रयत्न कर, न घाबरता पुढे जा, बाकी मी बघून घेईन, हा त्यांचा पाठीवर पडणारा हात आपल्याला अपयशाच्या आणि जगाच्या भीतीतून मुक्त करतो. समाजात वावरताना ताठ कणा ठेवून जगण्याचा जो निडरपणा आपल्यात येतो, तो वडिलांच्या डोक्यावर असलेल्या याच छत्रामुळे. ज्यांच्या पाठीशी वडील खंबीरपणे उभे असतात, त्यांना जगातील कोणत्याही वादळाची किंवा अनोळखी परिस्थितीची भीती वाटत नाही.

वडिलांचं प्रेम हे शिस्तीच्या आणि गंभीरतेच्या मुखवट्याआड लपलेलं असतं. ते कधीही आपल्याला जवळ घेऊन कौतुकाचे दोन शब्द बोलणार नाहीत, की कधी डोळ्यात पाणी आणून आपली काळजी उघडपणे दाखवणार नाहीत. पण म्हणून त्यांची माया कमी नसते. उलट, त्यांची माया सर्वात जास्त आणि अथांग असते. आपल्या मुलाच्या गरजा काय आहेत, त्यांना भविष्यात काय हवं आहे, यावर त्यांचं बारीक आणि सूक्ष्म लक्ष असतं. स्वतःचे कष्टाचे दिवस विसरून मुलांच्या सुखासाठी अहोरात्र झटणारा हा माणूस, घरात आल्यावर मात्र अगदी शांत आणि गंभीर चेहऱ्याने वावरतो. त्यांच्या या गंभीरतेमागे मुलांविषयीची अतोनात काळजी, त्यांची सुरक्षितता आणि जबाबदारीची जाणीव दडलेली असते. ते वटवृक्षासारखे असतात, जे स्वतः उन्हात जळतात पण संपूर्ण कुटुंबाला गारवा देतात. ते प्रेम व्यक्त करत नाहीत, कारण त्यांना माहिती असतं की कुटुंबाचा डोलारा सांभाळण्यासाठी आणि मुलांना जगाशी लढायला सक्षम बनवण्यासाठी स्वतः ला वरून वज्रासारखं कठीण ठेवावं लागतं.

वडिलांच्या काळजाची श्रीमंती ही पैशांपेक्षा खूप मोठी असते. आपल्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती कशी आहे. खिशात पैसे आहेत की नाही, याचा विचार वडील कधीच आपल्या मुलांसमोर येऊ देत नाहीत. घरात कितीही चणचण असो किंवा व्यवसायात-नोकरीत कितीही मंदी असो, मुलाने किंवा मुलीने एखादी गोष्ट मागितली, की ती त्यांच्यापर्यंत कशी पोहोचवायची यासाठी वडील रात्रीचा दिवस करतात. स्वतःच्या अनेक गरजा बाजूला ठेवून, स्वतःच्या इच्छा मारून मुलांचा प्रत्येक लहान-मोठा हट्ट अगदी आनंदाने पूर्ण करणारे वडीलच असतात. मुलांच्या चेहऱ्यावरील तो एक छोटासा आनंद पाहण्यासाठी वडील स्वतःचे सगळे कष्ट विसरून जातात. जगाच्या बाजारात आपल्याला कधीच कमी पडू न देणारा हा माणूस, स्वतःच्या परिस्थितीशी मात्र निमूटपणे आणि एकट्याने लढत असतो.

आपल्याला व्यवसायाचे, कामाचे आणि व्यावहारिक जगाचे पहिले ज्ञान वडिलांकडूनच मिळते. ते जे बोलतात आणि ज्या पद्धतीने जगतात, त्यातून आपल्या आयुष्याची मूल्ये ठरतात. माझ्या पप्पांनी मला दिलेले दोन कानमंत्र माझ्या आयुष्याची सर्वात मोठी शिदोरी आहेत, जे आजच्या संपूर्ण तरुण पिढीसाठी मार्गदर्शक ठरू शकतात:

**पहिला कानमंत्र:** आपलं काम आपण पूर्ण प्रामाणिकपणे आणि योग्य प्रकारे करायचं, कोण काय म्हणतंय याकडे अजिबात लक्ष द्यायचं नाही. हा कानमंत्र माणसाला जीवनात कर्मयोगी बनवतो. समाजात काम करताना, नवीन उद्योग-व्यवसाय उभारताना किंवा सामाजिक कार्य करताना लोक नाव ठेवतील, शंका घेतील, पाय खेचण्याचा प्रयत्न करतील. पण पप्पांचे हे शब्द आपल्याला शिकवतात की, जर तुमचे उद्दिष्ट प्रामाणिक असेल आणि तुमचे प्रयत्न योग्य दिशेने असतील, तर जगाच्या टीकेकडे दुर्लक्ष करून फक्त आपल्या कर्मावर लक्ष केंद्रित करा. हाच विचार माणसाला खऱ्या अर्थाने यशस्वी आणि निडर बनवतो.

**दुसरा कानमंत्र:** आयुष्यात कधीही कोणालाही दुखवायचे नाही, प्रत्येकाचा आदर करायचा. हा कानमंत्र माणसाला केवळ यशस्वीच नाही, तर एक उत्तम आणि संवेदनशील माणूस बनवतो. यशाचे शिखर गाठत असताना पाय जमिनीवर असणे आवश्यक आहे. पैसा आणि पद आज आहे तर उद्या नाही, पण आपण जोडलेली माणसे आणि त्यांना दिलेला आदर हीच आपली खरी संपत्ती असते. कितीही मोठे व्हा, पण लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांशी आदराने वागणे आणि कोणाच्याही मनाला आपल्यामुळे ठेच न पोहोचवणे, हीच खरी संस्कृती आहे. पप्पांचा हा कानमंत्र मला रोज एक चांगला माणूस बनण्याची प्रेरणा देतो.

आपल्या स्वप्नांना पंख देता देता, आपल्याला मोठे आणि निडर बनवता बनवता आपले बाबा कधी वृद्ध होतात, हे आपल्याला समजतच नाही. ज्या वडिलांनी आपल्याला बोट धरून चालायला शिकवलं, ज्यांचा कणा कधीही वाकला नाही, काळाच्या ओघात त्यांचेच हात थरथरु लागतात, शरीर थकते आणि विचारांमध्ये एक प्रकारचा संकोच येतो. वृद्धापकाळ हे आयुष्याचं असं वळण आहे, जिथे हा कणखर माणूस पुन्हा एका लहान बाळासारखा होतो. ज्याप्रमाणे लहान मूल हट्टी असतं, छोट्या गोष्टीवरून चिडतं, त्याला सतत कोणाच्या तरी सोबतीची, स्पर्शाची आणि प्रेमाची गरज असते; अगदी तशीच अवस्था वृद्धापकाळात वडिलांची होते. दुर्दैवाने, आजच्या वेगवान जगात अनेकदा मुलं त्यांच्या या बदलत्या स्वभावाला, विसरभोळेपणाला किंवा हट्टाला समजून घेत नाहीत आणि चिडचिड करतात. पण आपण हे विसरतो की, लहानपणी जेव्हा आपण हजारो हट्ट करायचो, न समजता चुका करायचो, तेव्हा याच बाबांनी स्वतःच्या परिस्थितीची तमा न बाळगता आपल्याला हसून पदरात घेतलं होतं. आज त्यांना आपल्या पैशांपेक्षा किंवा भौतिक सुख-सुविधांपेक्षा आपल्या वेळेची, दोन गोड शब्दांची आणि प्रेमाची जास्त गरज असते. वृद्धापकाळात त्यांना लहान बाळासारखं सांभाळून घेणं, त्यांच्या खांद्याला आपला खंबीर आडोसा देणं हीच खऱ्या अर्थाने पितृऋणातून मुक्त होण्याची पहिली पायरी आहे. कालानुरूप जसे मुलांचे कर्तव्य बदलते, तसेच आजच्या बदलत्या कौटुंबिक आणि सामाजिक वातावरणात वडील म्हणून पुरुषाच्या भूमिकेतही सकारात्मक आणि प्रगल्भ बदल होणे गरजेचे आहे.

वडिलांचे मुलांच्या आयुष्यातील स्थान जितके आदराचे आहे, तितकीच त्यांची नैतिक आणि सामाजिक जबाबदारीही मोठी आहे. कारण, मुलं ही नेहमीच आपल्या वडिलांची वागणूक, त्यांची संस्कृती आणि त्यांचे आचरण जवळून पाहत असतात आणि नकळत तेच आपल्या आयुष्यात अंगीकारत असतात. वडिलांची समाजात उठबस कशी आहे, ते संकटाच्या वेळी स्वतःवर ताबा कसा ठेवतात, त्यांची व्यसने कोणती आहेत, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते घरात आपल्या आईचा म्हणजेच स्त्रीचा कसा आदर करतात, हे सर्व मुलं अगदी लहानपणापासून टिपत असतात. वडील हे मुलांसाठी जगातील पहिले रोल मॉडेल असतात. त्यामुळे आजच्या वडिलांनी केवळ शब्दांतून कोरडा उपदेश न करता, आपले स्वतःचे आचरण अत्यंत शुद्ध, सुजाण, व्यसनमुक्त आणि आदर्श ठेवणे गरजेचे आहे. पूर्वीच्या काळी वडिलांचा प्रचंड धाक असणे हीच संस्कृती मानली जायची. पण आजच्या अत्यंत वेगवान आणि मानसिक ताणतणावाच्या युगात वडिलांनी केवळ धाक किंवा दहशत न राहता मुलांचा मित्र होणे ही काळाची गरज आहे. आजच्या पिढीतील वडिलांनी मुलांशी असलेला संवादाचा अभाव वेळीच दूर केला पाहिजे. वडिलांनी घरात असे हक्काचे वातावरण निर्माण केले पाहिजे, जिथे मूल आपले अपयश, आपले प्रश्न, आपले मानसिक ताणतणाव आणि आपल्या भावना वडिलांसमोर बिनधास्तपणे मांडू शकेल. शिस्तीला जर प्रेमाची आणि मैत्रीची जोड दिली, तर मुलं आयुष्यात कधीच भरकटणार नाहीत. आजच्या अत्यंत स्पर्धात्मक युगात मुलांवर अभ्यासाचे आणि करिअरचे प्रचंड दडपण असते. अशा वेळी आजच्या वडिलांनी मुलांची इतरांशी तुलना करणे थांबवले पाहिजे. त्याच्या मुलाला बघ किती गुण मिळाले तो कसा पुढे गेला अशा तुलना मुलांच्या आत्मविश्वासाचा खून करतात. आपल्या मुलाची क्षमता कशात आहे हे ओळखून त्याला मानसिक पाठबळ देणे आवश्यक आहे. मुलाला केवळ पैसे कमवणारे यंत्र न बनवता, त्याला एक संवेदनशील आणि मानसिकदृष्ट्या सक्षम माणूस बनवण्यासाठी वडिलांनी आपला वेळ दिला पाहिजे.

आजच्या या फादर्स डेच्या निमित्ताने संपूर्ण समाजाला हेच आवाहन आहे की, आपले आचरण आदर्श ठेवा आणि आपल्या वृद्ध बाबांना तेच प्रेम आणि आदर द्या, ज्याचे ते खरोखर मानकरी आहेत. कारण वडिलांचे उत्तम आचरण हा मुलांचा खरा वारसा असतो, आणि वृद्ध वडिलांची सेवा हे मुलांचे परम कर्तव्य असते! जगातील सर्व वडिलांना फादर्स डेच्या मनापासून हार्दिक शुभेच्छा!

**-रोहित विलासराव भोसीकर**
संचालक
भोसीकर फुड्स, नांदेड
मो. ८८०५५७५५५५

# शिक्षणाला निधीचा श्वास कधी मिळणार?

शिक्षणावरील खर्च हा कोणत्याही राष्ट्राच्या भविष्याचा पाया असतो. देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिक प्रगतीचा वेग शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. त्यामुळेच राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० मध्ये शिक्षणावरील खर्च सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (GDP) किमान सहा टक्क्यांपर्यंत नेण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. मात्र, संसदीय स्थायी समितीच्या ताज्या अहवालाने हे उद्दिष्ट अद्याप दूर असल्याचे स्पष्ट केले आहे. ही बाब केवळ आकडेवारीपुरती मर्यादित नसून देशाच्या विकासाच्या दिशेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

सध्या भारतात शिक्षणावर होणारा एकूण खर्च जीडीपीच्या केवळ ४.१२ टक्के इतका आहे. जगातील सर्वाधिक युवा लोकसंख्या असलेल्या देशासाठी हा आकडा समाधानकारक म्हणता येणार नाही. विशेषतः भूटान आणि मालदीवसारखे तुलनेने लहान देशही शिक्षणावर भारतापेक्षा अधिक खर्च करीत असतील, तर त्याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक हा खर्च नसून तो भविष्यातील विकासाचा पाया असतो, हे शासनाने लक्षात घेणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाने २०३५ पर्यंत उच्च शिक्षणातील सकल प्रवेशदर ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी नवीन विद्यापीठे, संशोधन केंद्रे, डिजिटल पायाभूत सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सहाय्य यांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. परंतु निधीची कमतरता असल्यास ही उद्दिष्टे केवळ कागदावरच राहण्याची शक्यता आहे. उच्च शिक्षण विभागाच्या अर्थसंकल्पात महागाईच्या तुलनेत पुरेशी वाढ न



झाल्याची समितीची चिंता त्यामुळे रास्त वाटते. शिक्षण क्षेत्रातील सर्वात मोठे आव्हान म्हणजे गुणवत्तेतील विषमता. शहरांतील आणि ग्रामीण भागातील शिक्षणाच्या संधींमध्ये मोठी तफावत आहे. अनेक शाळांमध्ये मूलभूत सुविधा, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव आहे. उच्च शिक्षणातही संशोधनासाठी आवश्यक निधी आणि आधुनिक सुविधा अपुऱ्या आहेत. अशा परिस्थितीत जागतिक दर्जाचे शिक्षण देण्याची अपेक्षा करणे वास्तववादी ठरणार नाही.

सरकारने वित्त मंत्रालयाच्या मर्यादांचा दाखला देत आपली भूमिका स्पष्ट केली असली, तरी शिक्षणाला खर्चाच्या यादीतील एक विभाग म्हणून पाहण्याऐवजी विकासाच्या केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. रस्ते, उद्योग आणि पायाभूत सुविधांइतकेच शिक्षणालाही प्राधान्य मिळाले पाहिजे. कारण सुशिक्षित आणि कौशल्यसंपन्न मानवसंपदा हीच कोणत्याही अर्थव्यवस्थेची खरी ताकद असते. आज भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याची आकांक्षा बाळगतो. परंतु आर्थिक महासत्ता बनण्याचा मार्ग शिक्षणाच्या वर्गखोल्यांतूनच जातो. शिक्षणावरील खर्च वाढविण्याचा प्रश्न हा केवळ बजेटचा विषय नाही; तो देशाच्या भवितव्याचा प्रश्न आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाची उद्दिष्टे साध्य करायची असतील, तर शिक्षण क्षेत्रासाठी अधिक उदार आर्थिक तरतूद करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा ज्ञानाधिष्ठित भारत हे स्वप्न घोषणांपुरतेच मर्यादित राहण्याचा धोका आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि. सांगली

# तंत्रज्ञानाच्या युगात सुसंस्कृत पिढी निपजणे काळाची गरज



निसर्गाने अनेक कृती आणि प्रकृत्ती या सृष्टीवर निर्माण केलेल्या आहेत. त्यामुळे सर्व संस्कृती मानवाने आजपर्यंत जपलेल्या आहेत. त्यामुळे कित्येक वर्ष उलटली तरी आपण आपल्या संस्कृती म्हणूनच पिढ्यांपिढ्या आपण आपापल्या धर्माप्रमाणे सर्व सण एकजुटीने साजरे करीत आहोत. मात्र अलीकडच्या काळात समाजात फार मोठे बदल होत आहेत. कारण आताची पिढी फक्त भ्रमात जीवन जगते आहे. हा माझा, तो माझा, मला विचारणारे माझे, पाहिले तर तुमची वेळ चांगली असेल तर सर्व तुमचे, नाहीतर सर्व जवळ असूनसुध्दा दूरचे आणि लांबचे असतात हेच जीवनाचे सत्य.

सकाळी लवकर उठणारे, रात्री वेळेवर झोपणारे, पाणी वाया न घालवता झाडाला घालणारे, देवांसाठी फुले तोडणारे, रोज पूजा करणारे, मंदिरात एखादी फेरी मारणारे, रस्त्यातून भेटणाऱ्यांची आस्थेने चौकशी करणारे, दोन्ही हात जोडून नमस्कार करणारे, अन्नधान्य वाया जाऊ नये म्हणून बेतानेच मर्यादित स्वयंपाक करणारे, त्यातून काही उरवून गोर गरिबांना देणारे, नाही तर उरलेसुरले सकाळी स्वतःच खाणारे, घरात गैरसोय असूनही पाहूणचार करणारे, व्यसन करताना लाजणारे आणि समाजाच्या नजरेची चीड बाळगणारे, जुना झालेला चष्मा तुटला तर चिटकवून वापरणारे, जुनी चप्पल फाटली तर शिवून आणि जुन्या बनियानला भोक पडेपर्यंत वापरणारे, उन्हाळ्यात पापड-कुरडे वाळवणारे, हात दुखेपर्यंत घरगुती मसाला कुटणारे, फक्त बाहेर घालणाऱ्या कपड्यांनाच इस्त्री करणारे, खिशातला पैसा जपून वापरणारे, शक्यतो घरीच जेवणारे, असे लोक आता हळूहळू हे जग सोडून चालले आहेत. आणि फक्त आजचा विचार करणारे लोक समाजात वावरू लागले आहेत. हे जग सोडणाऱ्यांबरोबर वरील अनेक चांगली शिकवणही जाईल.

समाधानी, चांगले, साधे, अर्थपूर्ण, दुसऱ्यांना प्रेरणा देणारे आणि समोरच्यांची काळजी करत जीवन जगायचे असते ही शिकवण सुध्दा या जगातून कायमची नाहीशी होईल. नेतृत्व, कर्तृत्व व स्वाभिमान सुध्दा त्यांच्याचबरोबर संपेल की काय अशी भीती वाटते. त्यासाठी प्रत्येक व्यक्तीने आपापल्या समाजाची संस्कृती जपणे हिताचे आहे. आधुनिकीकरणाच्या या युगात पूर्वपार चालत आलेल्या प्रथा, रीतीरिवाज या विसरुन चालणार नाहीत. उलटपक्षी त्यांचे पालन करू, आदराने सर्व समाजातील जनतेने आपापल्या संस्कृतीचे जतन करणे आवश्यक आहे. आताच्या इंटरनेटच्या संगणकीय जगात वावरताना बऱ्याच जुन्या परंपरांना विसरावेच लागेल. ज्याला दुःखाची जाणीव असते त्याला सुखाची किंमत कळलेली असते, म्हणून जे कष्टमय दिवस आपण काढले आहेत त्याची जाणीव ठेवा. सुंदर चेहरा म्हातारा होतो, बलाढ्य शरीर सुध्दा एक दिवस गळून पडते, मोठे पद सुध्दा एक दिवस निघून जाते, परंतु हे सर्व उपभोगणारा आणि सत्कार्य करणारा माणूस फक्त स्मरणात राहातो.

आनंद नेहमी चंदनासारखा असतो. दुसऱ्याच्या कपाळावर टिळा लावला तरी आपली बोटे सुगंधीत करून जातो. शून्यातून प्रवास करत माणसांनी प्रेरणादायी विश्व निर्माण केलेले आहे. याचा विसर कधीच पडू देऊ नका. माणूस कितीही मोठा असला, मोठ्या बंगल्यात राहिला, मोठ्या गाडीतून फिरला, उंची कपडे घातले तरी त्याची किंमत शून्य असते. कारण त्याच्या वागण्यावरुन आणि सत्कार्यावरुन त्याची किंमत ठरवली जाते. पक्षी जेव्हा जीवंत असतो तेव्हा तो किड्या-मुंग्याना खातो, पण जेव्हा तो मरतो तेव्हा त्यालाच किडे मुंग्या खातात. हाच निसर्गाचा नियम आहे. तुम्ही खुप शक्तीशाली असाल पण वेळ तुमच्यापेक्षा शक्तीशाली आहे. आपली वेळ आणि परिस्थिती केव्हाही बदलू शकते. म्हणून कोणाचाही अपमान करू नका किंवा कुणालाही कमी लेखू नका, हे सर्व जुन्या पिढीने जपले आहे ते असेच नव्या पिढीने जपावे. परिस्थितीप्रमाणे बदलणे ही काळाची गरज असली तरी आपण आपले संस्कार, रितीरीवाज, परंपरा आणि स्वाभिमान कधीही सोडू नये. हे सर्व पाहिले की वाटते. नव्या पिढीपुढे अनेक भयंकर आव्हाने आहेत. जसजसा काळ बदलेल तसतसे नवोदितांने ते अंगीकारणे प्रार्थनिय आहे. मागील पिढीचे अनुकरण करावेच असे नाही, परंतु त्यांना विसरू नये असे वाटते.

सध्या हे कलीयुग चालू आहे. आता पापपुण्याचा हिशोब जीवंतपणीच होतो. आपण जीवंत असेपर्यंत सर्व हिशोब चुकता करावा लागतो. त्यासाठी आई-वडील जे मार्गदर्शन करतात त्यांचे पालन तरुणाई करायला हवे. कारण वाड-वडिलांनी काबाडकष्ट करुन सर्व संसार सांभाळलेला असतो तो त्यांची आठवण म्हणून जतन करून ठेवला पाहिजे. गडगंज संपत्ती असली तरी ती सर्वांना ईथेच ठेवून जायची आहे. आपण असेपर्यत त्याचे जतन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. कारण चांगल्या लोकांचा मान कधी कमी होत नाही. सोन्याचे शंभर तुकडे केले तरीही त्याची किंमत होत नाही, चुकणं ही प्रकृती आहे, तर मान्य करणं ही संस्कृती आहे आणि आपल्या आचरणात सुधारणा करणे ही प्रगती आहे. जगायचे तर दिव्यासारखे जो राजाच्या महालात आणि गरिबांच्या झोपडीत सारखाच प्रकाश देतो. म्हणून नवीन पिढीने जुन्या जाणत्यांचे बुजुर्गांचे अनुकरण करणे गरजेचे वाटते. त्यासाठी नव्या पिढीने मागील पिढीला विसरू नये असे वाटते.

**-दत्ताराम दळवी**
लालबाग
मो. ९८२०५२७८५५

# नंदीग्राम एक्स्प्रेसची कोच संख्या वाढवा

## आ. भीमराव केराम यांची रेल्वेमंत्र्यांकडे मागणी

**किनवट (प्रतिनिधी)–** नंदीग्राम एक्स्प्रेसची कोच संख्या वाढविण्यात यावी, अशी मागणी आ. भीमराव केराम यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

मराठवाडा, विदर्भ आणि तेलंगणा या तीन मोठ्या क्षेत्रांना जोडणारी अत्यंत महत्त्वाची नंदीग्राम एक्स्प्रेसच्या कोच रचनेत रेल्वे प्रशासनाने नुकतेच बदल केले आहेत. या नवीन बदलांनुसार गाडीला आधुनिक 'एलएचबी' कोच जोडताना एकूण डब्यांची संख्या १८ वरून १६ करण्यात आली आहे, तर सर्वसामान्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या



असलेल्या नॉन-एसी स्लीपर कोचची संख्या थेट ८ वरून ५ वर आणली आहे. रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयामुळे प्रवाशांची क्षमता लक्षणीयरीत्या घटली असून, या भागातील हजारो प्रवाशांचे हाल होत आहेत. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत किनवट-माहूर विधानसभेचे आ. भीमराव केराम यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना थेट पत्र लिहून कोच रचनेचा तत्काळ पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे.

या संदर्भात आ. केराम यांनी पत्रात नमूद केले आहे की, नंदीग्राम एक्स्प्रेस ही मुंबई, ठाणे, कल्याण, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, किनवट, हिमायतनगर, भोकर, आदिलाबाद, चंद्रपूर आणि बल्लारशाह अशा अनेक प्रमुख शहरांना व दुर्गम भागांना जोडते. या भागातील लाखो नागरिक, विशेषतः विद्यार्थी, सरकारी-खासगी कर्मचारी, शेतकरी, व्यापारी आणि उपचारासाठी जाणारे रुग्ण पूर्णपणे याच गाडीवर अवलंबून आहेत. उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा, रोजगार आणि वैद्यकीय उपचारांसाठी ही गाडी या क्षेत्राची 'जीवनवाहिनी' मानली जाते. एलएचबी कोचमुळे सुरक्षा आणि प्रवास सुकर होणार असला तरी स्लीपर कोच कमी करणे हा निर्णय जनहिताच्या पूर्णपणे विपरीत आहे. या मार्गावरील बहुतांश प्रवासी हे ग्रामीण, जनजातीय आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गातील असून ते परवडणाऱ्या स्लीपर श्रेणीचाच वापर करतात. अतिरिक्त एसी कोचची व्यवस्था करणे स्वागतार्ह असले, तरी ते स्लीपर कोचला पर्याय ठरू शकत नाहीत. कारण सर्वसामान्य प्रवाशांना एसीचे तिकीट परवडणारे नाही. यामुळे आता वेटिंग लिस्ट आणखी वाढणार असून, प्रवाशांना मोठ्या गर्दीचा सामना करावा लागणार आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्या, दिवाळी, लग्नसराई आणि सणासुदीच्या काळात आधीच या गाडीला पाय ठेवायला जागा नसते, अशा स्थितीत डबे कमी केल्याने परिस्थिती अधिक बिकट झाली आहे. देशातील इतर अनेक एक्स्प्रेस गाड्या २० ते २२ डब्यांसह धावत असताना नंदीग्रामसारख्या प्रचंड गर्दीच्या गाडीची क्षमता कमी करणे अन्यायकारक असल्याचे सांगत आ. भीमराव केराम यांनी पत्राद्वारे रेल्वे बोर्ड आणि मध्य रेल्वे प्रशासनाला १ पूर्ण प्रथम श्रेणी वातानुकूलित कोच, २ एसी २-टियर कोच, ३ एसी ३-टियर कोच, ५ एसी इकॉनॉमी श्रेणी कोच, ८ स्लीपर श्रेणी (नॉन-एसी) कोच आवश्यकतेनुसार सामान्य आणि गार्ड-लगेज कोच. या संतुलित रचनेमुळे सर्वसामान्य, मध्यमवर्गीय आणि वातानुकूलित श्रेणीतील सर्वच प्रवाशांच्या गरजा पूर्ण होतील. रेल्वेमंत्र्यांनी या विषयात स्वतः सक्रिय हस्तक्षेप करून किनवट-माहूर आणि संपूर्ण मराठवाडा-विदर्भातील लाखो प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणी आ. भीमराव केराम यांनी केली आहे.

# तृतीयपंथी संशोधक डॉ. सान्वी जेठवाणी यांची भारत सरकारच्या प्रतिष्ठित ज्युनियर फेलोशिपसाठी निवड

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेडच्या सुप्रसिद्ध



तृतीयपंथी समाजसेविका, लावणी कलाकार, सांस्कृतिक कार्यकर्त्या व संशोधक डॉ. सान्वी जगदीश जेठवाणी यांची भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या सांस्कृतिक साधन व्यक्ती आणि प्रशिक्षण केंद्र (CCRT) मार्फत प्रदान करण्यात येणाऱ्या ward of Junior Fellowship (Batch २०२५२०२६) या प्रतिष्ठित राष्ट्रीय फेलोशिपसाठी निवड झाली आहे. देशभरातून आलेल्या अर्जांची छाननी, तज्ज्ञ समितीचे मूल्यमापन आणि निवड प्रक्रियेनंतर त्यांची निवड करण्यात आली आहे.

डॉ. जेठवाणी यांचा संशोधन विषय Performing Identities: Socio-Cultural Study of Transgender Participation in Lavani Folk Tradition of Maharashtra असा असून, या संशोधनामध्ये महाराष्ट्रातील लावणी लोकपरंपरेमध्ये तृतीयपंथी कलाकारांचे योगदान, त्यांचा सांस्कृतिक वारसा, सामाजिक स्थान, संघर्ष, कलात्मक अभिव्यक्ती आणि बदलती ओळख यांचा शास्त्रीय अभ्यास केला जाणार आहे. तृतीयपंथी कलाकारांच्या योगदानाचे दस्तऐवजीकरण करून त्याला राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक मान्यता मिळवून देण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

डॉ. सान्वी जेठवाणी यांच्या राष्ट्रीय स्तरावरील यशाबद्दल विविध सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# अखेर रामदास पवार तांड्यावर शाळा सुरू



**नांदेड (प्रतिनिधी)** –मुखेड तालुक्यातील रामदास पवार तांड्यावर ९ वर्षांच्या प्रदीर्घ संघर्षानंतर प्राथमिक शाळेला मान्यता मिळाली. दि. १५ जून रोजी शाळेचे वर्ग भरविण्यात आले असून, आसपासचे विद्यार्थी उपस्थित होते. इयत्ता १ ते ४ थीच्या वर्गांना मान्यता देण्यात आली आहे. तांड्यावरील विद्यार्थ्यांना शिक्षणाची दरवाजे उघडली आहेत. तांडा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आला असून, ज्ञान गंगा प्रवाहित झाली आहे, असे मत अनेक नागरिकांनी व्यक्त केले.

तालुक्यातील मुक्रमाबाद जवळील कोटग्याळ वाडी ग्रामपंचायत अंतर्गत रामदास पवार तांडा हा लहानशी वस्ती असलेला तांडा. शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून अनेक वर्षांपासून वंचित होता. भौतिक सुविधा उपलब्ध झाली असली तरी शैक्षणिक सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांची हेळसांड होत होती. अनेक वर्षे शिक्षणासाठी इतर गावात स्थलांतरित किंवा ये-जा करावी लागत असे. ग्रामीण भागातील तसेच ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी आ. डॉ. तुषार राठोड यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, जिल्हा परिषद शिक्षण विभागाने येत्या शैक्षणिक वर्षापासून तांड्यावर प्राथमिक शाळा सुरू केली आहे. तसेच तेथे शिक्षक नियुक्ती करण्यात आले आहेत. आंदेगाववाडी येथील शिक्षक सुभाष जाधव यांना तात्पुरते प्रतिनियुक्तीवर पाठवले आहे. शिक्षण विस्तार अधिकारी गंगाधर राठोड, शिक्षण विस्तार अधिकारी तथा केंद्रप्रमुख शिवाजी पाटील, प्रा. डी. आर. पवार आदी यावेळी उपस्थित होते.

मुक्रमाबादपासून सुमारे ९ किलोमीटर अंतरावर असलेल्या रामदास पवार तांड्यावर २०१७ मध्ये प्राथमिक शाळा सुरू करण्यात आली होती. त्यावेळी शिक्षक नियुक्तीही करण्यात आली होती. मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या चुकीच्या अहवालामुळे अवघ्या तीन महिन्यांत शिक्षकाची बदली करण्यात आली आणि शाळा बंद पडली. परिणामी तांड्यावरील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी रोज ९ किलोमीटर अंतर पायी मुक्रमाबाद येथे जावे लागत होते.

तांड्यावर पुन्हा शाळा सुरू व्हावी यासाठी स्थानिक रहिवासी प्रा. डी. आर. पवार यांनी पुढाकार घेत स्वतःच्या मालकीची ४२ गुंठे जमीन जिल्हा परिषदेला हस्तांतरित केली. शिक्षण हक्क कायद्याचा आधार घेत तांड्याजवळ शिक्षणाची सुविधा नसल्याची बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. मात्र दीर्घकाळ सकारात्मक निर्णय झाला नव्हता. दरम्यान, अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ. डॉ. तुषार राठोड यांनी तारांकित प्रश्न उपस्थिता करून हा विषय शासनाच्या निदर्शनास आणून दिला. त्यानंतर शालेय शिक्षण राज्यमंत्री यांनी आवश्यकतेनुसार शाळांना पुन्हा मान्यता देण्याचे आश्वासन दिले होते. यानंतर आ. डॉ. राठोड यांनी पाठपुरावा केला. त्यामुळे ७ मे रोजी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने शासन निर्णय व अहवालाच्या आधारे पवार तांडयावर प्राथमिक शाळेला मान्यता दिली आणि शाळा सुरू झाली.

# जुना कौठा भागातील दत्त मंदिरात कलशारोहण सोहळा उत्साहात; हजारो भाविकांची उपस्थिती

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** जुना कौठा भागातील श्रीपाद नगर येथील दत्त मंदिरात अधिक मासानिमित्ताने कलशारोहण सोहळा बुधवार, दि. १७ जून रोजी सकाळी मठाधिश यदुबन महाराज कोलंबीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

यावेळी मंदिर अध्यक्ष विठ्ठल काळे यांनी विधीवत पूजन केल्यानंतर कलशारोहण करण्यात आले. यावेळी भाविकांनी मोठ्या प्रमाणात जयघोष केला. हभप माऊली महाराज मुंडेकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या भागवत कथा प्रवचक हभप प्रवीणशास्त्री केळीकर यांच्या सुमधुर वाणीतून संगीतमय कथा संपन्न झाली.





दरवर्षी प्रमाणे याही वर्षी १० जून ते १६ जून दरम्यान भागवत कथेला उत्साहात सुरुवात झाली. प्रारंभी सकाळी श्रीपाद नगर जुना कौठा भागात श्रीमद भागवत, कथा कलश मिरवणूक काढण्यात आली. अधिकमास निमित्ताने श्रीमद भागवत कथा व कलशारोहण सोहळा श्री यदुबन महाराज कोलंबीकर कोलंबीचे मठाधिश यांच्या व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. श्रीमद भागवत कथा प्रवचक प्रवीण शास्त्री केळीकर यांच्या समुधर वाणीतून १० ते १६ जून रोजी दररोज दुपारी आयोजित करण्यात आली होती. १० जून रोजी आयोजित श्रीमद् भागवत कथा, कलश मिरवणूक सकाळी १० वाजता निघाली. हभप भागवत कथाकार प्रवीण शास्त्री केळीकर यांच्या सुमधुर वाणीतून संगीतमय कथा पार पडली. १७ जून रोजी हभप माऊली महाराज मुडीकर यांचे सकाळी १० ते १२ काल्याच्या कीर्तनानंतर लगेच महाप्रसाद माजी जिल्हा परिषद सदस्य तथा नगरसेवक प्रतिनिधी गंगाप्रसाद काकडे यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता,

या सोहळ्याला माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे, नगरसेवक प्रतिनिधी राजू पाटील काळे, पंजाब काळे, गंगाप्रसाद तोष्णीवाल, रोहीत शास्त्री आडकलवार यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, विविध पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सप्ताहामध्ये दैनंदिन यजमान आरती करणाऱ्या भाविक भक्तांच्या व प्रमुख उपस्थितीत मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

अखंड हरिनाम सप्ताह व कलशोहरण सोहळा यशस्वीतेसाठी आयोजक विठ्ठल गोविंदराव काळे मंदिर समिती अध्यक्ष व सर्व सदस्य श्री स्वामी समर्थ, दत्त व नर्मदेश्वर महादेव मंदिर, श्रीपाद नगर, जुना कौठा नांदेड यांनी परिश्रम घेतले.

# सायाळ येथे शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांची बैल गाडीतून मिरवणूक काढून केले जोरदार स्वागत

**लोहा (प्रतिनिधी)** –शिकेल तो टिकेल, विद्या हेच जीवन, असा नारा देत लोहा तालुक्यातील मौजे सायाळ येथे दि. १५ जून २०२६ रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना शिक्षणाची ओढ लागावी, त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून सायाळचे भूमिपुत्र तथा छावा युवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष माऊली पाटील पवार व सायाळ-भाद्रा ग्रामपंचायतचे सरपंच अण्णाराव पाटील पवार यांनी सायाळ येथील विद्यार्थ्यांची बैल गाडीतून मिरवणूक काढून विद्यार्थ्यांचे शाळेत जोरदार स्वागत करण्यात आले.



यावेळी छावा युवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष माऊली पाटील पवार, सायाळचे सरपंच अण्णाराव पाटील पवार, जि. प. शाळेचे मुख्याध्यापक काशिनाथ शिरसीकर, शालेय समितीचे अध्यक्ष विठ्ठल शिंदे, गिरमाजी पवार, गोविंद मोरतळे यांच्यासह गावकरी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांची बैल गाडीतून मिरवणूक काढून त्यांचे शाळेत उत्साहात स्वागत करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले. या स्वागत समारंभामुळे नवागत विद्यार्थ्यांमध्ये उत्साह संचारला असल्याचे दिसून आले.

# महाराणा प्रतापसिंह महाराज यांच्या जयंतीनिमित्त सिडको परिसरातील वृत्तपत्र विक्रेता पाल्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** वीरशिरोमणी महाराणा प्रतापसिंह महाराज यांच्या जयंतीनिमित्त नांदेड जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या सिडको शाखा येथे १७ जून रोजी वृत्तपत्र विक्रेत्यांच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्य व मिठाईचे वाटप करण्यात आले.




दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महाराणा प्रतापसिंह महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन ज्येष्ठ विक्रेते मदनसिंह चौहान यांच्या हस्ते पूजा करण्यात आले. यावेळी नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष रमेश ठाकूर व महिला वितरक वंदना लोणे, शेख सयोद्दीन व वृत्तपत्र विक्रेता संघटना अध्यक्ष सतीश कदम, दिलीप ठाकूर, बालाजी सुताडे, राजू चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून मिठाई वाटप करण्यात आली.

यावेळी वृत्तपत्र विक्रेत्यांच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्य, परीक्षा पॅड, वही-पेन व मिठाई वाटप करण्यात आली. नवीन नांदेड मराठी पत्रकार संघाचे सह कोषाध्यक्ष तिरूपती पाटील घोगरे, गणेश डोळस यांच्यासह वृत्तपत्र विक्रेता राम धावंडे, अमोल नांदेडकर, तातेराव वाघमारे, गणेश ठाकूर, धुर्व लोणे यांच्यासह अनेक वृत्तपत्र विक्रेता उपस्थित होते.

# लोहा न. प. च्या प्रभारी कार्यालयीन अधीक्षकपदी उल्हास राठोड

**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा नगर परिषदेच्या प्रभारी कार्यालयीन



अधीक्षक पदी उल्हास राठोड यांच्याकडे पदभार सोपविण्यात आला आहे.

लोहा न.प. चे कार्यालयीन अधीक्षक पुजारी हे रजेवर गेले असल्याने सदरील पद रिक्त होते. या रिक्त पदावर लोहा न. प. चे कर्मचारी तथा माजी कार्यालयीन अधीक्षक यांच्या कामाची दखल घेऊन त्यांची लोहा न. प.च्या प्रभारी कार्यालयीन अधीक्षकपदी नियुक्ती केली आहे. त्यांच्या या नियुक्तीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.


ੴ ਸਤਿਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ ॥

ਤਖ਼ਤ ਸੱਚਖੰਡ ਸ੍ਰੀ ਹਜ਼ੂਰ ਅਬਿਚਲਨਗਰ ਸਾਹਿਬ, ਨਾਂਦੇੜ- ੪੩੧ ੬੦੧ (ਮਹਾਰਾਸ਼ਟਰਾ)-ਭਾਰਤ

Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded-431 601 (Maharashtra) - India

Ph.No. 02462-234813, 241266, 243559

E-Mail:- contact@hazursahib.com roombooking@hazursahib.com Visit us at :- http://www.hazursahib.com

No. ..........................  Date......................

**GURUDWARA SACHKHAND BOARD, NANDED**
**SHORT TERM TENDER NOTICE**
**for Supply & Installation of Polycarbonate Poly Sheet Work**

Sealed tenders are hereby invited from reputed Wholesale Hardware Dealers, Polycarbonate Sheet Suppliers, Contractors and Agencies for Supply, Transportation, Loading–Unloading, and Installation and Labour Work of Polycarbonate Canopy Shed Work at Darbar Sahib Ji Gurudwara Sachkhand Board. Nanded.
The work shall be executed on Complete Material + Labour Basis.

**Scope of Work (Approximate Quantity)**

| Sr. No. | Description of Item | Unit | Approx. Qty. |
|---|---|---|---|
| 1 | Supply & Fixing of Polycarbonate Sheet (Milky White Coated Colour), Thickness 6 mm to 10 mm | Sq.Ft. | Approx. 12,000 Sq.Ft. & Above |
| 2 | Aluminium Patti with Rubber Cover including fixing | R.Ft. | Approx 500 & Above |
| 3 | Patta Screw / Self Drilling Screw with EPDM Washer complete | Nos. | As Required |
| 4 | Silicon / Weather Sealant including application | L.S. | As Required |
| 5 | Transportation, Loading–Unloading, Handling | L.S. | Complete |
| 6 | Labour Charges for Installation / Fixing / Finishing | Sq.Ft. | Complete |
| 7 | Scaffolding, Safety Arrangement and Consumables | L.S. | Complete |

**Tender Conditions:-**Vendors shall quote rates for 10 mm Polycarbonate (Milky White)Sheet.Vendors shall quote complete total work rate including Material + Labour.Rates shall be inclusive of GST. transportation loading, unloading, installation and all incidental charges.Vendor shall specify the Brand Name,Thickness,Weight of Sheet,Warranty / UV Protection Details,Labour Charges.Transportation Charges.Quantities are approximate and may vary as per actual requirement.Supply shall include complete fixing accessories required for execution.

**Documents to be Submitted:-**GST Registration Certificate,PAN Card,Firm Profile.Technical Catalogue,Similar Work Experience,Warranty Details,Signed & Stamped BOQ,Interested parties shall submit quotation in sealed envelope superscribed. **The Last Date for submission of Quotations is up to 23/06/2026** during office hours i.e 9.00 am to 5.30 pmThe Superintendent Gurudwara Sachkhand Board reserves the right to accept, reject or cancel any or all tenders without assigning any reason.

**Superintendent**
**Gurudwara Sachkhand Board, Nanded**


# विनापरवाना सागाची वाहतूक करणारा ऑटोरिक्षा जप्त; दोन आरोपींना वनकोठडी

**किनवट (प्रतिनिधी)–** पाटोदा येथील राखीव वन रस्त्यालगत अवैध वृक्षतोड करून सागाच्या लाकडांची विनापरवाना वाहतूक करणाऱ्या ऑटोरिक्षावर वनविभागाने छापा टाकून कारवाई केली आहे. या कारवाईत दोन आरोपींना रंगेहात पकडण्यात आले असून, अन्य दोन आरोपी गर्दीचा फायदा घेऊन पसार झाले आहेत. वनविभागाने एकूण ६० हजार ४०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अटकेतील आरोपींना दोन दिवसांची वनकोठडी सुनावण्यात आली आहे.



किनवट तालुक्याच्या पाटोदा राखीव वनक्षेत्रातून विना नंबर व विनापरवाना ऑटोरिक्षा सागी माल घेऊन चिखली बु. या गावाकडे जात असल्याची माहिती बोधडी बु. वनविभागाला दि. १५ जून रोजी मिळाली. या माहितीवरून वन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तत्काळ सापळा रचून सदर वाहनाचा पाठलाग केला आणि त्याला अडविले.वाहनाची झडती घेतली असता त्यात सागी ८ गोल लाकडे किंमत १० हजार ४०५ व विना नंबर ऑटोरिक्षा किंमत रु. ५० हजार असा एकूण ६०,४०५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले. वनविभागाने या कारवाईत जुबेर खैरोद्दीन शेख (रा. चिखली बु.), मारुती गुरुनाथ केसाळे (रा. चिखली बु.) या दोघांना ताब्यात घेतले.तर गर्दी, वाहनांच्या वर्दळीचा फायदा घेत शेख मज्जु इद्रीस व शेख जाकीर शेख अहमद हे दोघे घटनास्थळावरून पसार झाले. अटक करण्यात आलेल्या आरोपींवर भारतीय वन अधिनियम १९२७ अन्वये वनगुन्हा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपींना किनवटच्या प्रथम श्रेणी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना दि. १८ जूनपर्यंतपर्यंत वनकोठडी सुनावली आहे.

सदर कारवाई नांदेडच्या उपवनसंरक्षक मनीषा पाटील, रोहयो व वन्यजीव विभागाचे सहायक वनसंरक्षक श्रीकांत इटलोड, बोधडीचे वनपरिक्षेत्र अधिकारी सी. जी. पोतुलवार यांच्या आदेशान्वये करण्यात आली.

कारवाईत वनपाल शेळके, के. एम. बडूरे, जी. पी. निलपत्रेवार, वनरक्षक विद्या बोर्डे, नरेंद्र चुकलवार, आकाश रंगे, एस. पी. काळे, डी. एम. गड्डे, के. एस. खोत, पवन दांडगे, अमर मुराडे, पवन सोनुने आणि लिपीक ओमप्रकाश मारकवाड यांचा सहभाग होता.

# अंतर्मन



# घरात मनी प्लांट... टाळा सात चुका..!

## वास्तू तज्ञ योग्य दिशा अन् फायदे सांगतात...

वास्तुशास्त्रानुसार, घरात मनी प्लांट लावल्याने सुख आणि समृद्धी येते. मनी प्लांट लावणे खूप शुभ मानले जाते. तथापि, मनी प्लांट योग्य दिशेत लावणे देखील खूप महत्त्वाचे आहे. वास्तुशास्त्रानुसार, मनी प्लांट लावणे हे सकारात्मक ऊर्जा आणि आर्थिक स्थिरतेशी संबंधित आहे. तथापि, ते लावण्याची योग्य पद्धत आणि दिशा जाणून घेणे महत्त्वाचे आहे. वास्तुशास्त्रानुसार, मनी प्लांट योग्य दिशेत लावणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शिवाय, मनी प्लांट लावताना विशेष काळजी घेणे महत्त्वाचे आहे. मनी प्लांटशी संबंधित वास्तु टिप्स जाणून घेऊया...

## मनी प्लांटशी संबंधित या चुका करू नका...

» वास्तुशास्त्रानुसार, मनी प्लांट कधीही ईशान्य कोपऱ्यात लावू नये. ही दिशा गुरु ग्रहाची आहे आणि तिथे मनी प्लांट लावल्याने आर्थिक अडचणी आणि वाढलेला ताण येऊ शकतो.

» मनी प्लांटची पाने जमिनीला स्पर्श करणार नाहीत याची खात्री करा. त्याला दोरीने किंवा लाकडी दांड्याने वरच्या दिशेने बांधा, जेणेकरून ते वरच्या दिशेने वाढू शकेल.

» वाळलेले मनी प्लांट कधीही घरात ठेवू नका. जर पाने पिवळी पडली किंवा सुकली, तर ती कापून टाका. मनी प्लांट हिरवेगार ठेवण्याचा प्रयत्न करा.

» मनी प्लांट नेहमी घराबाहेर लावा. ते तुमच्या बाल्कनीत ठेवा. ते लोकांच्या नजरेपासून दूर ठेवा.

» तुमचे मनी प्लांट दुसऱ्या कोणालाही भेट देऊ नका, तसेच ते दुसऱ्याच्या घरातून चोरू नका.

» जर तुम्ही तुमच्या घरात पाण्याच्या बाटलीत मनी प्लांट लावत असाल, तर निळ्या रंगाची बाटली वापरा. ते लावण्यासाठी सर्वात शुभ दिशा आग्नेय आहे. ते मातीच्या कुंडीत लावा.

» मनी प्लांट लावण्यासाठी शुक्रवार हा सर्वात शुभ दिवस मानला जातो. हा दिवस देवी लक्ष्मीला समर्पित आहे. त्यामुळे या दिवशी मनी प्लांट लावणे अत्यंत शुभ आणि फलदायी ठरेल.

## मनी प्लांटसोबत कोणती झाडे लावावीत?

» तुम्ही मनी प्लांटसोबत तुमच्या घरात इतर झाडे लावू शकता, ज्यामुळे दुहेरी लाभ मिळू शकतो. वास्तु गुरू स्पष्ट करतात की, प्रत्येक झाडाची स्वतःची एक विशिष्ट ऊर्जा असते. त्यामुळे, मनी प्लांटसोबत योग्य रोप लावणे खूप महत्त्वाचे आहे.

» मनी प्लांटच्या बाजूला जेड प्लांट लावू शकता. जेड प्लांटला कुबेर वनस्पती म्हणूनही ओळखले जाते. ही वनस्पती पैसा आकर्षित करणारी मानली जाते. आग्नेय दिशेला ठेवल्यास घरात लवकर पैसा येतो, असा विश्वास आहे.

» तुम्ही मनी प्लांटच्या बाजूला लकी बांबूचे रोप देखील लावू शकता. जर तुम्ही तुमच्या घरात पाणी साचलेले मनी प्लांट लावले असेल, तर त्याच्या बाजूला लकी बांबूचे रोप लावणे सर्वात पवित्र मानले जाते.

» मनी प्लांटच्या बाजूला तुळशीचे रोप नक्की लावा. तुळशीचे रोप लावल्याने घरात सकारात्मक ऊर्जा टिकून राहते. तुळस नात्यांमध्ये आनंद, शांती आणि गोडवा देखील आणते.

» वास्तु गुरू मान्या यांच्या मते, मनी प्लांटच्या बाजूला स्नेक प्लांट लावल्याने नकारात्मक ऊर्जा आणि तणाव दूर होऊ शकतो. मनी प्लांटच्या बाजूला ठेवल्याने वातावरणही शुद्ध होते.

» तुम्ही मनी प्लांटच्या शेजारी पीस लिलीचे रोपदेखील लावू शकता. मनी प्लांटच्या शेजारी ठेवल्यास त्याची पांढरी फुले हवा शुद्ध करण्याचे काम करतात. यामुळे घरातील हवा शुद्ध होते. मनी प्लांटच्या शेजारी हार्टलीफ फिलोडेंड्रॉन लावता येते.

### मनी प्लांटच्या शेजारी कोणती रोपे लावू नयेत?

वास्तु तज्ञांच्या मते, कॅक्टस आणि बोन्साय रोपे मनी प्लांटच्या शेजारी कधीही ठेवू नयेत. ही रोपे मनी प्लांटची ऊर्जा शोषून घेतात आणि त्याची वाढ मंदावतात.

## संध्याकाळी दारात या 5 गोष्टी करणे टाळा!

1 कचरा किंवा कचरापेटी ठेवू नका : जर तुम्ही संध्याकाळी साफसफाई करताना कचरापेटी किंवा घरातील कचरा दाराजवळ किंवा बाहेर ठेवत असाल, तर ते ताबडतोब थांबवा. दाराजवळ कधीही कचरापेटी किंवा कचरा सोडू नका. असे मानले जाते की संध्याकाळ ही देवी लक्ष्मीच्या आगमनाची वेळ आहे, जी मुख्य दरवाजातून प्रवेश करते.

2 मुख्य दरवाजा बंद करू नका : मुख्य दरवाजा संध्याकाळी कधीही बंद करू नये. शक्य असल्यास सूर्यास्ताच्या वेळी आणि प्रदोष काळात दरवाजा उघडा ठेवावा, कारण मुख्य दरवाजा सकारात्मक ऊर्जा आणि देवी लक्ष्मीला घरात आणतो.

3 जोडे ठेवू नका : आपल्या घराच्या उंबरठ्याजवळ किंवा थेट समोर जोडे ठेवणे अशुभ मानले जाते. संध्याकाळी याची विशेष काळजी घेतली पाहिजे. असे केल्याने कुटुंबात अशांतता निर्माण होऊ शकते आणि देवी लक्ष्मीऐवजी अलक्ष्मी घरात वास करू शकते.

4 झाडू मारू नका : असे मानले जाते की संध्याकाळी, म्हणजेच सूर्यास्तानंतर, घर किंवा दाराची पायरी कधीही झाडू मारू नये. असे केल्याने देवी लक्ष्मी क्रोधित होऊ शकते, ज्यामुळे गरिबी आणि वाईट इच्छा निर्माण होतात.

5 दाराची पायरी अंधारी ठेवू नका : सूर्यास्ताची वेळ देवी लक्ष्मीच्या आगमनाची वेळ मानली जाते. म्हणून, या काळात दाराची पायरी कधीही अंधारी ठेवू नये. तिथे नेहमी एक बल्ब चालू ठेवावा. अंधार हे नकारात्मकतेचे प्रतीक मानले जाते. म्हणून, संध्याकाळी दाराची पायरी अंधारी ठेवल्याने परिसरातील सकारात्मक ऊर्जा दूर होऊ शकते.

# एल निनोचा प्रभाव, यावर्षी मान्सून कोरडा की पडेल मुसळधार?

**एल निनो हा भारतीय मान्सूनवर परिणाम करणाऱ्या प्रमुख घटकांपैकी एक आहे. पॅसिफिक महासागरातील तापमान आणि वातावरणीय परिस्थितीतील बदलांचा जागतिक हवामान प्रणालीवर परिणाम होतो आणि भारतीय मान्सूनही त्याला अपवाद नाही. पण प्रश्न इथेच संपत नाही. जर पॅसिफिक महासागराच्या वाढलेल्या तापमानामुळे एल निनो होत असेल, तर त्या वाढीमागे कोणत्या प्रक्रिया कार्यरत आहेत? यासाठी केवळ सागरी प्रणालीच जबाबदार आहे, की जागतिक हवामान प्रणालीमध्ये सक्रिय असलेले इतर घटकही यात भूमिका बजावतात? कोणतीही गुंतागुंतीची नैसर्गिक घटना समजून घेण्यासाठी, तिच्या कारणांच्या साखळीचे शक्य तितक्या सर्वसमावेशकपणे परीक्षण करणे आवश्यक आहे. चला तर मग, ज्योतिषी, योग आणि आध्यात्मिक विचारवंत बी. कृष्णा यांच्याकडून याबद्दल अधिक जाणून घेऊया...**



भारतीय दृष्टिकोनातून पाऊस हा एकाच कारणाचा परिणाम नसून, अनेक नैसर्गिक, खगोलशास्त्रीय आणि पर्यावरणीय घटकांची एकत्रित अभिव्यक्ती आहे. जर आपण या दृष्टिकोनातून वर्ष २०२६ चा अभ्यास केला, तर काही चिन्हे दिसतात जी केवळ एल निनोच्या चर्चेपेक्षा खूप व्यापक चित्र सादर करतात.

» मेघगर्भ : २०२६ सालासाठीची चिन्हे दर्शवतात की मेघगर्भ पूर्णपणे कमजोर नाही. याचा अर्थ असा की पावसाची शक्यता संपलेली नाही.

» खंडित नौतप : २०२६ मध्ये नौतप काळात होणाऱ्या पावसामुळे खंडित नौतपाची परिस्थिती निर्माण होते. पारंपरिक पर्जन्यमान सिद्धांतानुसार, हे मान्सूनच्या हंगामात तुलनेने कमी पावसाचे लक्षण मानले जाते.

» बुध-शुक्र युती : २०२६ च्या मान्सूनमधील बुध आणि शुक्राच्या स्थितीकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. पावसासाठी अनुकूल मानल्या जाणाऱ्या बुध-शुक्र युतीचा अभाव अपेक्षेपेक्षा कमी पावसाचे संकेत देतो. ही परिस्थिती संपूर्ण मान्सून हंगामात कायम राहण्याची आणि ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत प्रभावी राहण्याची शक्यता आहे.

## ग्रहण आणि सागरी बदल

२०२६ चा मान्सून समजून घेण्यासाठी १७ फेब्रुवारीला झालेले सूर्यग्रहण आणि ३ मार्चला झालेल्या चंद्रग्रहणाचाही विचार करणे आवश्यक आहे. ज्योतिषशास्त्रानुसार, ग्रहणांच्या प्रभावामुळे समुद्राच्या पाण्याची पीएच पातळी बदलते. समुद्राच्या पाण्याच्या रासायनिक स्वरूपातील हा बदल सागरी वातावरणाचे संतुलन बिघडवतो, ज्यामुळे मान्सून चक्र आणि पर्जन्यमान या दोन्हींवर गंभीर परिणाम होतो. या बदललेल्या चक्र आणि स्वरूपामुळे ढगांची निर्मिती कमी होईल, परिणामी अपेक्षेपेक्षा कमी पाऊस पडेल.

## हस्त नक्षत्र

हस्त नक्षत्र हे पर्जन्यमानाचा निर्णायक टप्पा मानले जाते. जर हस्त नक्षत्र अनुकूल ठरले, तर मान्सूनमधील अनेक उणिवा भरून निघू शकतात. २०२६ मध्ये हस्त नक्षत्रादरम्यानची ग्रहस्थिती तुलनेने सकारात्मक संकेत देते. यावरून असे सूचित होते की, मान्सूनच्या उत्तरार्धात अनेक भागांना दिलासा मिळू शकतो आणि सुरुवातीचा असमतोल काही प्रमाणात संतुलित होऊ शकतो. हे सर्व ग्रहयोग, नक्षत्र संकेत, तारखा, दिवस, महिने, ढगाळपणा आणि पर्जन्यमानाचे पारंपरिक घटक यांचा सखोल अभ्यास केल्यास असे दिसून येते की, २०२६ हे वर्ष त्याच्या एकूण पर्जन्यमानापेक्षा अस्थिर आणि बदलत्या पर्जन्यमानासाठी ओळखले जाईल. त्यामुळे हे वर्ष वेळ, ठिकाण आणि तीव्रता या तिन्ही स्तरांवर असंतुलित मान्सून दर्शवते, ज्यामुळे कृषी आणि जल व्यवस्थापन या क्षेत्रांमध्ये अधिक काळजीपूर्वक नियोजन आणि अनुकूलनाची आवश्यकता असेल.

## शनी-बुध युती

२०२६ च्या मान्सून हंगामात जुलै महिन्याचा उत्तरार्ध विशेष उल्लेखनीय आहे. या काळात शनी आणि बुध यांच्यातील परस्पर युती पावसासाठी तुलनेने अनुकूल संकेत देते. ज्योतिषशास्त्रानुसार, ही युती पावसाला पोषक परिस्थिती अधिक मजबूत करते. या प्रभावामुळे जुलै महिन्याच्या उत्तरार्धात पावसाची परिस्थिती जून महिन्यापेक्षा चांगली असण्याची शक्यता आहे. अनेक भागांमध्ये पावसाचे प्रमाण वाढण्याची, कोरड्या परिस्थितीत घट होण्याची आणि शेतीसाठी तुलनेने अधिक अनुकूल वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. ही युती मान्सून हंगामाच्या मधल्या टप्प्यात पावसाच्या वाढीस अनुकूल असलेल्या प्रमुख निर्देशकांपैकी एक आहे.

## आषाढ महिन्यातील तिथीनुसार ग्रहयोग



आषाढ महिन्याच्या पंचमी आणि त्यावेळच्या दिवसाच्या संयोगातून पर्जन्यमानाचा विचार केल्यास मिळणारे संकेत विशेष उत्साहवर्धक नाहीत. पारंपरिक पर्जन्य ज्योतिषशास्त्रानुसार, असे संयोग कमी पर्जन्यमान, पावसात खंड आणि कोरड्या परिस्थितीस कारणीभूत ठरतात. त्यामुळे आषाढ महिन्यातील हे संकेत २०२६ मध्ये दुष्काळाची शक्यता अधिकच बळकट करतात. ग्रहणांनंतर दिसणारे सागरी बदल, बुध-शुक्र संबंध आणि पर्जन्यमानातील संभाव्य असंतुलन या चित्रालाही आषाढ महिन्यातील संयोगांचा आधार मिळतो.

# ब्रह्मांडातील अदृश्य लहरी बदलतात तुमचे निर्णय!


**दररोज, आपण करिअरपासून ते नातेसंबंधांपर्यंत शेकडो लहान-मोठे निर्णय घेतो. कधीकधी, आपण खूप विचारपूर्वक निर्णय घेतो, तरीही त्याचा परिणाम चुकीचा ठरतो. कधीकधी क्षणात घेतलेला निर्णय इतिहास घडवतो. असे का घडते? आपल्या मनात अशी कोणती अदृश्य शक्ती आहे का जी आपल्याला हे करण्यास प्रवृत्त करते? वैज्ञानिकदृष्ट्या ब्रह्मांडातील अदृश्य लहरी, ग्रह आणि तारे मानवी मेंदूशी जोडलेले आहेत, म्हणजेच आपण आणि ब्रह्मांड वेगळे नाहीत...**

विज्ञानाचा असा विश्वास आहे, की ब्रह्मांडात सर्व काही ऊर्जा आणि कंपन आहे. सूर्यापासून निघणारा सौर वारा आणि ग्रहांची स्वतःची प्रचंड चुंबकीय क्षेत्रे आहेत. पृथ्वी या सौरमालेचा एक भाग आहे आणि आपणही तिचाच एक भाग आहोत. जेव्हा जेव्हा अवकाशात मोठी उलथापालथ होते, तेव्हा पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र बदलते. या बदलाचा मानवी मेंदूतील न्यूरोट्रान्समीटरवर थेट परिणाम होतो. सोप्या भाषेत सांगायचे तर, ग्रहांची स्थिती आपल्या मनःस्थितीवर आणि विचार करण्याच्या क्षमतेवर प्रभाव टाकते. अचूक निर्णय घेण्यासाठी तीन गोष्टी आवश्यक आहेत : अचूक माहिती, मानसिक स्थिरता आणि योग्य वेळ. शतकानुशतके ज्योतिषशास्त्र हे ग्रहांच्या गोचरांच्या परिणामांद्वारे यश आणि मानसिक स्थिरतेसाठी योग्य वेळेचे भाकीत करत आले आहे. हेच भविष्यकथन ज्योतिषशास्त्राचा वैज्ञानिक आधार आहे. विज्ञान ज्याला मेंदूचा तार्किक भाग म्हणते, त्याला ज्योतिषशास्त्र बुध ग्रहाचे कार्य म्हणून वर्णन करते. जेव्हा बुध अनुकूल स्थितीत असतो, तेव्हा व्यक्तीची विश्लेषणात्मक क्षमता अचूक असते. यशस्वी निर्णय घेण्यासाठी भावनांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. चंद्र पृथ्वीच्या सर्वात जवळ असतो आणि त्याचे गुरुत्वाकर्षण आपल्या मेंदूतील द्रवांवर परिणाम करते, ज्यामुळे पौर्णिमा किंवा अमावस्येच्या आसपास लोक अधिक भावनिक किंवा आक्रमक निर्णय घेतात. ग्रह आणि ताऱ्यांच्या प्रभावाला अंधश्रद्धा मानून घाबरण्याऐवजी त्यांचा वैज्ञानिक प्रभाव समजून घेतल्यास आपल्याला जीवनात चांगले निर्णय घेण्यास मदत होऊ शकते. राहू किंवा चंद्राच्या प्रभावाखाली असताना जेव्हा तुमचे मन अत्यंत अस्वस्थ किंवा उत्तेजित असते, तेव्हा जीवनातील मोठे निर्णय पुढे ढकलले पाहिजेत.



# तुमच्या जन्मतारखेत अंक आहे 3? अत्यंत बुद्धिमान आहात तुम्ही!

**तुमच्या जन्मतारखेत अंक ३ येतो का? तुम्ही दिवसाचे २४ तास विचार करत असता आणि इतरांचे दोष व गुण पटकन दाखवून देता का? तर हे सर्व तुमच्या जन्मतारखेतील अंक ३ मुळे आहे. अंकशास्त्रानुसार, प्रत्येक अंकाची स्वतःची ऊर्जा असते. त्याचप्रमाणे, एखाद्या व्यक्तीच्या जन्मतारखेत ३ हा अंक किती वेळा येतो, यावर अवलंबून त्या अंकाची ऊर्जा त्याच्या वागणुकीवर आणि व्यक्तिमत्त्वावर एक वेगळा प्रभाव टाकते. ज्या लोकांचा अंक ३ असतो, त्यांना अनेकदा हट्टी मानले जाते आणि गर्दीत तुम्हाला एकटेपणा जाणवू शकतो, कधीकधी तुम्हाला आश्चर्य वाटेल की तुम्हाला कोणी का समजत नाही. हा तुमचा दोष नाही, कारण तुमच्या जन्मतारखेत ३ हा अंक आहे. चला, अंकशास्त्र तज्ञ आणि वास्तु गुरु मान्या यांच्याकडून जाणून घेऊया की तुमच्या जन्मतारखेतील ३ या अंकाचा काय अर्थ आहे...**



जर तुमची जन्मतारीख २३- १२- १९९३ असेल तर तुमच्या जन्मतारखेत ३ हा अंक दोन दा येतो. त्याचप्रमाणे, तुम्ही तुमची जन्मतारीख पाहून तुमच्या जन्मतारखेत ३ हा अंक किती वेळा येतो हे ठरवू शकता. अंक शास्त्र तज्ञ स्पष्ट करतात की, जर तुमच्या जन्मतारखेत ३ हा अंक एकदा आला असेल, तर याचा अर्थ असा होतो की तुम्ही जन्मतःच बुद्धिमान आहात. अशा लोकांची बुद्धी खूप तल्लख असते. त्यां च्यामध्ये आयुष्यभर समाजाच्या भल्यासाठी महान गोष्टी साध्य करण्याची शक्ती असते. जर तुमच्या जन्मतारखेत ३ हा अंक दोनदा आला असेल, तर तुम्ही एक चालते-फिरते निर्माते आहात. तुमची कल्पनाशक्ती आणि लेखन कौशल्ये एका वेगळ्याच पातळीवर आहेत. फक्त तुमच्या कल्पनाशक्तीला योग्य दिशा द्या. अन्यथा, तुम्ही वास्तवापासून दूर जाल. तुमच्या लेखनाला उत्पन्नाचे साधन बनवा. जर तुमच्या जन्मतारखेत ३ हा अंक तीनदा आला असेल, तर तुम्ही खूप जास्त विचार करता. तुम्ही नेहमी तुमच्या विचारांमध्ये हरवलेले असता. तुम्हाला मित्र कसे बनवावेत हे माहित नसते. तुम्हाला सल्ला दिला जातो की प्रत्येक गोष्टीवर निरर्थक वाद घालणे थांबवा आणि तुमच्या छंदांचा पाठपुरावा करा. जर तुमच्या जन्मतारखेत ३ हा अंक चारदा आला असेल, तर त्यातून बाहेर पडणारी ऊर्जा व्यक्तीला अहंकारी बनवू शकते आणि अशा लोकांमध्ये संयमाची कमतरता असते. तुम्हाला प्रत्येक गोष्ट कठोर परिश्रमाने आणि सहजतेने मिळवायची असते. तुमच्या मनात एक अज्ञात भीती देखील रेंगाळत असते. तुम्हाला तुमच्या आयुष्यात अहंकारापासून दूर राहण्याचा सल्ला दिला जातो.

## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




# अनैतिक संबंधातून झालेल्या हत्येच्या गुन्ह्यात मयताची पत्नी व प्रियकर गजाआड

**नांदेड (प्रतिनिधी)** –मरखेल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका महिलेने पती हरवल्याची २५ दिवसानंतर तक्रार दिल्याने एकुर्गा शिवारात सापडलेल्या मृतदेहाबद्दल पोलिसांनाही संशय आला. तपासाची चक्रे फिरवल्यानंतर अखेर हा खून अनैतिक संबंधातूनच झाला असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर मरखेल पोलिसांनी मयताची पत्नी आणि तिच्या प्रियकराला अटक केली आहे. पोलीस तपासात उभयतांनी संगनमत करून खून केल्याची कबुली दिली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन मरखेल येथील पोलीस अधिकारी व अंमलदारांनी तपासा एका अनोळखी खुनाचा उलगडा करण्यात यश संपादन केले. जवळपास दोन महिन्यांपासून बेपत्ता असलेल्या व्यक्तीचा खून झाल्याचे उघडकीस आणत आरोपींना अटक करण्यात आली आहे.



रामकिशन गंगाधर गोलेवार रा. एकुर्गा ता. देगलूर हे दि. २५ एप्रिल २०२६ पासून बेपत्ता असल्याची माहिती त्याची पत्नी दैवशाला रामकिशन गोलेवार (वय ४०) हिने दि. १७ मे २०२६ रोजी पोलीस स्टेशन मरखेल येथे दिली. त्यानुसार मिसिंग क्र. ०६/२०२६ दाखल करण्यात आली होती. सुरुवातीला हे प्रकरण केवळ मिसिंगचे दिसून येत असले तरी तपासादरम्यान स्थानिक पोलिसांना अनेक संशयास्पद बाबी आढळून आल्या. तसेच बेपत्ता व्यक्तीचा शोध घेण्यासाठी अपेक्षित प्रयत्न दैवशाला रामकिशन गोलेवार हिच्याकडून होत नसल्याचे दिसून येत आले. यामुळे तपास पथकाने या प्रकरणाकडे केवळ मिसिंग म्हणून न पाहता सखोल तपास सुरू केला.

बेपत्ता व्यक्तीच्या चौकशीदरम्यान गावातून दैवशाला रामकिशन गोलेवार हिचे त्याच गावातील सुभाष व्यंकन्ना यत्तरवाड (वय ४५ आमदापूर ता. देगलूर) याच्याशी अनैतिक संबंध असल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाली. पोलिसांनी तपासाची चक्रे गतीने फिरवली. या तपासात रामकिशन गोलेवार यांना पत्नीच्या अनैतिक संबंधांची माहिती होती व त्यावरून घरगुती वाद होत असल्याची बाबही समोर आली. तपासादरम्यान दैवशाला रामकिशन गोलेवार, सुभाष व्यंकन्ना यत्तरवाड व संबंधित व्यक्तींचे मोबाईल कॉल डिटेल रेकॉर्ड प्राप्त करून तपासण्यात आले. त्यामध्ये दैवशाला व सुभाष यांच्यामध्ये दररोज संपर्क होत असल्याचे निष्पन्न झाले. मात्र मिसिंग प्रकरण पोलिसांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांच्या संपर्कामध्ये अचानक खंड पडल्याचे आढळले. मरखेल पोलिसांनी केलेल्या तपासात दैवशाला रामकिशन गोलेवार हिने तिचा पती रामकिशन गोलेवार यांचा दगडाने ठेचून खून केल्याची कबुली दिली व मृतदेह शेतात पुरल्याचे सांगितले.

कबुली जवाबानंतर आरोपीने मृतदेह पुरल्याची जागा दाखवून दिली. घटनास्थळी मिळालेल्या कपड्यांच्या आधारे मृताच्या नातेवाईकांनी प्राथमिक ओळख पटविली. हणमंत गंगाधर गोलेवार यांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन मारखेल येथे गु.र.नं. १००/२६ कलम भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०३, २३८, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्यातील आरोपी दैवशाला रामकिशन गोलेवार हिस आमदापूर येथून तर सुभाष व्यंकन्ना यतरवाड याला भायंदरपाडा नागलाबंदर ठाणे येथून अटक करण्यात आली.

# २३ जून रोजी काँग्रेसचा आसूड मोर्चा व नवनिर्वाचित जिल्हाध्यक्षांचा पदग्रहण सोहळा- खा. रवींद्र चव्हाण

## प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची राहणार विशेष उपस्थिती

**नांदेड (प्रतिनिधी)** – प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत शेती व शेतकरी यांच्यावर अन्याय करणाऱ्या सरकार विरोधात व विविध मागण्यांसाठी जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने २३ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर आसूड मोर्चा काढण्यात येणार आहे. या दरम्यान नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष व महानगराध्यक्ष यांचा पदग्रहण सोहळा होणार असल्याची माहिती खासदार तथा दक्षिण जिल्हाध्यक्ष रवींद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांनी दिली आहे.

बुधवार दि.१७ रोजी प्रमुख पदाधिकारी यांच्या उपस्थितीत एसआयआर मोहिमेसह मोर्चा व पदग्रहण सोहळ्यासंदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी खा. रविंद्र चव्हाण बोलत होते. ऐन पेरणीच्या काळात



देखील सरकारच्यावतीने शेतकरी विरोधी धोरणे राबविण्याचे, थट्टा करण्याचे काम सुरू आहे. यामुळेच शेती व इतर मागण्या घेऊन प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या विशेष उपस्थितीत दि. २३ जून रोजी काँग्रेसच्या वतीने आसूड मोर्चा काढण्यात येणार असल्याचे खा. रवींद्र चव्हाण यांनी म्हटले आहे.

यावेळी माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, सुरेश गायकवाड, ओबीसी विभाग प्रदेशाध्यक्ष प्रा. यशपाल भिंगे, डॉ. श्रावण रॅपणवाड, एकनाथ उर्फ अनिल मोरे, सुरेंद्र घोडजकर, माजी जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, आनंद चव्हाण, तिरुपती कोंढेकर, रमेश चित्ते, श्रीनिवास मोरे, गोविंद बाबा गोंड, मधुकर दिघे, संजय कऱ्हाळे, प्रताप देशमुख बारडकर, राजू पाटील रावणगावकर, जेसिका शिंदे, सुरेश हाटकर, कुमार कुर्तडीकर, संदीपकुमार देशमुख, विलास पावडे, संदिप देशमुख तरोडेकर, बापूसाहेब पाटील, गणेश ढगे, संजय वाघमारे, दिपकसिंग हुजुरीया, गगन यादव, अतुल पेदेवाड, शंकर शिंदे, आंबादास रातोळे, सुरज शिंदे, अक्षय नळगे, गौतम सिरसाट, नागराज सुलगेकर, जेसिका शिंदे, ज्योती कदम, सुरेखा वैद्य, शितल जोंधळे, चांदोजी सुर्यवंशी, शामराव मनाठकर, गंगाधर आडेराव, गणेश कोकाटे, प्रकाश दिपके, गोविंद पाटील, एसपी कुंभारे, अझर शेख, धनंजय उमरीकर आदींसह कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.




**लोहा** – राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त लोहा न. प. च्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी आ. प्रतपराव पाटील चिखलीकर मार्गदर्शन करताना घेण्यात आलेल्या छायाचित्रात प्रवीण पाटील चिखलीकर, सचिन पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीमभाई शेख, गटनेते भास्कर पवार, माजी पं. स. सभापदी आनंदराव शिंदे, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवारआदी दिसत आहेत. **(छाया–विनोद महाबळे, लोहा)**

# रुक्मिणीबाई शिंदे यांचे निधन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – नांदेड तालुक्यातील धनेगाव येथील ज्येष्ठ महिला नागरिक रुक्मिणीबाई नारायणराव पाटील शिंदे यांचे गुरुवार, दि. १८ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. निधन समयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. त्यांच्या पार्थिवावर दि. १९ जून रोजी सकाळी १० वाजता वसरणी येथील नावघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात १ मुलगा, ५ मुली, नातू, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते बालाजी शिंदे यांची आई तर पत्रकार दिगंबर शिंदे, दिगा पाटील यांच्या त्या काकू होत.

# श्री क्षेत्र येवती येथील मठाधिपती नराशाम महाराज येवतीकर यांचा वाढदिवस साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)** –मुखेड तालुक्यातील श्री क्षेत्र येवती (लघु आळंदी) येथील जागृत देवस्थान नराशाम महाराज मठ संस्थानचे मठाधिपती नराशाम महाराज यांचा ४७ वा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

नराशाम महाराज यांना शुभेच्छा देण्यासाठी व आशीर्वाद घेण्यासाठी अनेक भाविकांनी एकच गर्दी केली होती. मुखेड तालुक्यातील श्रीक्षेत्र येवती येथे नराशाम महाराज जागृत मठ संस्थान आहे. या संस्थानचे मठाधिपती नराशाम महाराज



यांचा ४७ वा वाढदिवस सेवा समितीतर्फे मठ संस्थान येवती (लघु आळंदी) येथे उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी नराशाम महाराज यांची औक्षवंत, पाद्यपूजा, ग्रंथतुला करण्यात आली. यावेळी ३१ सुहासिनी यांनी नराशाम महाराज यांना औक्षवंत करून शुभेच्छा दिल्या. सेवा समितीच्या वतीने यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मठ संस्थानामार्फत मे २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या पवित्र श्री पशुपतिनाथ यात्रेची माहितीही भाविकांना देण्यात आली. यात्रेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी आपली नावे लवकरात लवकर नोंदवावीत, असे आवाहन सद्गुरू सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# जबरी चोरीतील ७ आरोपी भाग्यनगर व रामतीर्थ पोलिसांच्या जाळ्यात



**नांदेड (प्रतिनिधी)** –शहराच्या भाग्यनगर आणि ग्रामीण भागातील रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीत खंजरचा धाक दाखवून जबरी चोरी करणारे चोरटे पोलिसांच्या जाळ्यात अडकले. भाग्यनगर पोलिसांनी ५ जणांना तर रामतीर्थ पोलिसांनी २ जणांच्या मुसक्या आवळल्या. त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करून चोरलेला मुद्देमाल जप्त केला आहे.

बुधवार, दि. १७ जून रोजी तक्रारदार विजय महादेव पडोळे रा. तरोडा नाका नांदेड यांनी भाग्यनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली की, काही अनोळखी युवकांनी मी मालेगाव रोडने जात असताना स्कुटी वाहन क्र. (एमएच २६- वीएम- १९९०) चे समोर गाडी आडवी लावून माझी स्कुटी जबरीने हिसकावून घेतली. सदर गुन्ह्यातील अनोळखी आरोपीचा शोध पोलीस निरीक्षक संतोष तांबे, महेश मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख आणि नरेश वाडेवाले आणि त्यांचे सहकारी घेत होते.


यावेळी मिळालेल्या माहितीनुसार पथक आणि स्वयंवर मंगल कार्यालय नांदेड या ठिकाणी सापळा रचून आरोपी आकाश आनंदराव साखरे रा. स्नेहनगर नांदेड, विजय भगवान वानखेडे रा. आमदार नगर नांदेड, माधव आनंदराव नंदनकर रा. तुळशीराम नगर नांदेड, प्रतीक बालाजी ससाने रा. भगवान नगर नांदेड आणि एक अल्पवयीन अशा पाच जणांना ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी विजय पडोळे यांना लुटल्याची कबूल दिली. यावेळी पोलिसांनी चोरट्यांकडून एक स्कुटी व एक स्विफ्ट कार जप्त केली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख करत आहेत.

तसेच दि. १७ जून रोजी तक्रारदार रावसाहेब विठ्ठल येरडे (वय ५५ रा. जिगळा ता. बिलोली) यांनी रामतीर्थ ठाण्यात तक्रार दिली की, ते त्यांच्या मोटारसायकलवर बसून बिलोली ते नरसी रोडने जात असताना अनोळखी दोन युवकांनी त्यांचा रस्ता आडवून धाक दाखवून त्यांच्याकडून त्यांचा ओप्पो कंपनीचा मोबाईल व नगदी अडीच हजार रुपये जबरीने काढून घेतले. याबाबतच्या तक्रारीवरुन रामतीर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यातील अनोळखी आरोपीचा शोध सहायक पोलीस निरीक्षक विक्रांत हराळे व त्यांचे सहकारी घेत असतांना गोपनीय माहितीवरून नमूद दोन संशयीतांना ताब्यात घेवून रामतीर्थ येथील जबरी चोरी गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबूल केले. त्यांच्याकडून गुन्ह्यात चोरीस गेलेला मोबाईल व एक खंजर जप्त करण्यात आला आहे. आरोपींवर अटकेची कारवाई करण्यात आली असून, तपास पोलीस उपनिरीक्षक तानाजी पाटील करत आहेत.

# अखेर टॉवरची घडी सुरू; वागदरीकर यांच्या पाठपुराव्याला यश

**नांदेड (प्रतिनिधी)** – शहराच्या ऐतिहासिक अस्मितेचे प्रतीक असलेल्या जुना मोंढा टॉवरवरील बंद पडलेली घडी अखेर पुन्हा सुरू झाली असून, पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते किशोरकुमार वागदरीकर यांच्या जवळपास वर्षभराच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे. अनेक वर्षांपासून बंद असलेली ही घडी नव्या स्वरूपात कार्यान्वित झाल्याने नांदेडकरांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

नांदेड शहरातील जुना मोंढा टॉवरवरील घडी बंद असल्यामुळे शहराच्या ऐतिहासिक वैभवाला ग्रहण लागल्याची भावना नागरिकांमध्ये होती. ही घडी पुन्हा



सुरू व्हावी, यासाठी किशोरकुमार वागदरीकर यांनी महानगरपालिका प्रशासन, विभागीय आयुक्त, नगरविकास विभाग तसेच मुख्यमंत्री कार्यालयापर्यंत सातत्याने पाठपुरावा केला. विविध स्तरांवर निवेदने देत आणि वेळोवेळी स्मरणपत्रे सादर करत त्यांनी हा प्रश्न लावून धरला. अखेर प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेत घडीची दुरुस्ती पूर्ण केली आणि ती पुन्हा सुरू करण्यात आली. अनेक वर्षांनंतर टॉवरवरील घड्याळाचे काटे फिरू लागल्याने जुना मोंढा परिसरातील नागरिक, व्यापारी व इतिहासप्रेमींनी समाधान व्यक्त केले आहे.

शहराच्या ऐतिहासिक वारशाचे जतन आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. जुना मोंढा येथील टॉवरची घडी सुरू होणे ही केवळ दुरुस्ती नसून, शहराच्या इतिहासाला आणि सांस्कृतिक ओळखीला दिलेला नवा सन्मान असल्याचे मत व्यक्त होत आहे.



**नांदेड** – शिवसेना सोडून गेलेल्या खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्या प्रतिकृती पुतळ्यास छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरात जोडे मारो आंदोलन करण्यात आले. तसेच त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे मनोज यादव, सुनिल कदम, भाया शर्मा, लालचंद यादव, नवनाथ जोगदंड, राजू यादव, अशोक वाघमारे, अमजद लाला, परवेज खान, अशोक पावडे आदी. **(छाया : करणसिंह बैस)**

# महाराणा प्रतापसिंह महाराज यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराणा प्रतापसिंह महाराज यांच्या जयंतीनिमित्त १७ जून रोजी महाराणा प्रतापसिंह महाराज चौक पुतळा नांदेड येथे घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन खासदार रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात जवळपास ८५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

वीर शिरोमणी हिंदू कुलभूषण राष्ट्रीय वीर महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर घेण्यात आले. या रक्तदान शिबिरात हुजुर साहेब ब्लड बँकेच्या वतीने रक्त संकलन करण्यात आले. या शिबिरात एकूण ८५ जणांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबिराचे आयोजन महेश ठाकूर यांनी केले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण, माजी नगरसेवक



दिलीपसिंघ सोडी, गिरीश नारखेडे, विक्रमसिंह ठाकूर, शंकरसिंह ठाकूर, पवनसिंह बैस, पुनिता रावत, सुषमा गहेरवार, संतोषसिंह गौर, अनिकेतसिंह परदेशी, आदर्श यादव, राजेंद्र जाधव, राम पाटील, संघरत्न जाधव, साईकृष्णा पेन्लेवाड, अमित कल्याणकर, गुड्डू ठाकूर, सोनू ठाकूर, हेमंत पांचाळ, पिंटू पाटील यांच्यासह समाजबांधव व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किनवट केंद्रावर ४१ मतदारांनी बजावला हक्क

**किनवट (प्रतिनिधी)** –विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी गुरुवार, दि. १८ जून रोजी झालेल्या निवडणुकीत किनवट - माहूर विधानसभा मतदारसंघाच्या किनवट मतदान केंद्रावर किनवट - माहूर पालिकेच्या एकूण ४१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावून १०० टक्के मतदान केले.

किनवट पालिकेत शिवसेना महाविकास आघाडीच्या नगराध्यक्षांसह १२ नगरसेवक तर भाजप महायुतीचेही १२ नगरसेवक आहेत. माहूरमध्ये महाविकास आघाडी १४ तर महायुती ३ असे पक्षीय बलाबल आहे. गुरुवारी झालेल्या निवडणूक प्रक्रियेत किनवटच्या नगराध्यक्षा सौ. सुजाता एंड्रलवार, माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांच्यासह २३ महिला, तर १८ पुरुष नगरसेवकांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानप्रक्रिया किनवट



तहसील कार्यालयात मतदान केंद्राध्यक्षा तथा तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांच्या मार्गदर्शनात नायब तहसीलदार चंद्रशेखर सहारे, मुकेश कोल्हे, अवधूत बुडकेवाड यांनी पारदर्शकरित्या पार पाडली. उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघणे, पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी यावेळी चोख बंदोबस्त ठेवला होता. महायुतीच्या नगरसेवकांचे शंभर टक्के मतदान यशस्वी होण्यासाठी आ. भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनात अशोक नेम्मानीवार, माजी नगराध्यक्ष साजीद खान, भाजपचे गटनेते श्रीनिवास नेम्मानीवार, तालुकाध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांनी प्रयत्न केले.

**उमेदवार राजूरकर किनवटमध्ये तळ ठोकून!**

नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाचे भाजप महायुतीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर हे गुरुवारी सकाळपासूनच किनवटमध्ये तळ ठोकून होते. किनवट - माहूरचे नगरसेवक सहलीवरून परतल्यानंतर बुधवार, दि. १७ जून रोजी नगरसेवक यवतमाळ मुक्कामी होते. तिथे त्यांची 'तालीम' झाल्यानंतर गुरुवारी सकाळी उमेदवार राजूरकर नगरसेवकांसह किनवटमध्ये दाखल झाले. सबंध निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत त्यांनी किनवटमध्येच तळ ठोकला होता. यावरून त्यांना किनवट -माहूर येथील लोकप्रतिनिधींवर भरोसा नाही का, असा प्रश्न उपस्थित केला गेला.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.


फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com